नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### अमरावती-मुंबई विमानसेवेत बदल

अमरावती (स. गांवकरी) : अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईसाठी सुरू असलेल्या विमानसेवेच्या वेळापत्रकात पुन्हा एकदा मोठा बदल करण्यात आला आहे. २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आता आठवड्यातून केवळ चार दिवसच अमरावती-मुंबई विमान उड्डाण करणार असल्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सद्वारे केली आहे. एअरलाइन्सच्या अंतर्गत तांत्रिक कारणांमुळे हा बदल करण्यात आला असून, आता सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या चार दिवशीच विमानसेवा उपलब्ध असेल. अमरावती ते मुंबई दरम्यान १६ एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या एका वर्षाच्या कालावधीत 'अलायन्स एअरलाइन्स' कंपनीमार्फत आठवड्यातून चार दिवस विमानसेवा दिली जात होती. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद पाहता, मे २०२६ नंतर या विमानसेवेचे दिवस वाढवून ती आठवड्यातून ५ दिवस करण्यात आली होती. मात्र, आता कंपनीला भेडसावणाऱ्या काही तांत्रिक अडचणींमुळे २५ ऑगस्टपासून या विमान उड्डाणांच्या संख्येत पुन्हा कपात करण्यात आली आहे.

### बाळासाहेबांचे विचारही गोठवा

मुंबई (स. गांवकरी) : शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' हे पक्षचिन्ह गोठवण्याची मागणी ठाकरे पक्षाकडून न्यायालयात करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे पक्षाने व्यंगचित्राच्या माध्यमातून ठाकरे पक्षावर टीका केली आहे. 'विचारही गोठवा' या शीर्षकाखाली शिंदे पक्षाने समाजमाध्यमांवर प्रसिध्द केलेल्या व्यंगचित्रातून उद्धव ठाकरे आणि ठाकरे पक्षाच्या भूमिकेवर बोचरी टीका केली आहे. या व्यंगचित्रात उद्धव ठाकरे न्यायालयासमोर उभे आहेत. न्यायमूर्तींना ते म्हणत आहेत. 'यांच्याकडे बाळासाहेबांचे विचारही आहेत, तेही गोठवा,' अशा आशयाचे व्यंगचित्र काढण्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला भगवा ध्वज, धनुष्यबाण आणि वाघाचे चित्र दाखवण्यात आले आहे. शिवसेनेचे मुख्य नेता आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही चित्र व्यंगचित्रात आहे. आकाशात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे चित्र दाखवून त्यांच्या विचारांचा वारसा आम्ही पुढे घेऊन जात आहोत असा संदेश देण्यात आला आहे.

### शिक्षकांच्या २,४२१ पदांची मेगाभरती

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व बिगर पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. 'पवित्र' पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २,४२१ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. आदिवासी विकास विभागाच्या नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर या चारही विभागांतील शासकीय आश्रमशाळांतील २,४२१ जागांसाठी शिक्षक भरती प्रक्रिया सुरु आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ८२६ पदे असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ६१३ पदे, नागपूर विभागात ५१४ पदे तर अमरावती विभागात ४६८ पदे भरली जाणार आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशा विविध पदांचा समावेश आहे. शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीमध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ तर बिगर पेसा क्षेत्रातील १,५३६ पदांचा समावेश आहे.

# मुंढेंचा मोर्चा आता खाद्यतेलाकडे

## सुटे तेल विकण्यास बंदी, विक्रेत्यांना दिला मोठा इशारा



**सुटे तेल विकण्यास बंदी; विक्रेत्यांना दिला इशारा**

"सुटे खाद्यतेल विकता येत नाही. किरकोळ खाद्यतेल विक्रेत्यांनी आता सुटे तेल खरेदी करू नये. तसेच भेसळयुक्त तेल विकल्यास ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते आणि १० लाखांचा दंड होऊ शकतो", असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने राज्यभरात भेसळखोरांच्या विरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे. भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाका लावला आहे. मुंढे यांच्या या धडाकेबाज कामाची सध्या राज्यात मोठी चर्चा सुरू आहे.

भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण, शाळांमधील खाणावळी यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा खाद्यतेलाकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी आज (२० ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत खाद्यतेल विक्रीबाबत महत्वाचे निर्देश जारी केले आहेत. यापुढे आता सुटे खाद्यतेल विकण्यास बंदी असणार आहे. तसेच खाद्यतेलाबाबत एफडीएच्या नियमांची यादी तुकाराम मुंढे यांनी सांगितली आहे.

""सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या अंतर्गत आपण काम करत आहोत, आता आपण काही कंप्लायंस ऑर्डर काढत आहोत. आधी आपण हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिल्क प्रोडक्टबाबत ऑर्डर काढली होती. राज्यातील शाळांच्या बाबतीत देखील कंप्लायंस ऑर्डर काढली होती. या सर्वांची अंमलबजावणी सुरू आहे. आता 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेच्या पुढचा एक महत्वाचा टप्पा आहे. याबाबतीत पुढील कंप्लायंस ऑर्डर आपण आजपासून जारी करत आहोत. ही एडीबल ऑईलच्या (खाद्यतेल) संदर्भातील आहे", अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

"खाद्यतेल हे सर्व नागरिकांच्या घरात असतं. हे खाद्यतेल आपल्याला वेगवेगळे पदार्थ बनवण्यासाठी लागतं. २०११ च्या कायद्यानुसार, लायसन्स असणं किंवा रजिस्ट्रेशन्स असणं आणि फूड प्रॉडक्टच्या बाबतीत जे नियम आहेत ते पाळणं आणि त्यानुसार खाद्यतेलाच प्रोडक्शन होणं आणि विक्री करणं गरजेचं आहे", असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे.

"गेल्या काही काळात आम्ही काही तपासण्या केल्या असता आम्हाला काही गंभीर मुद्दे आढळून आले आहेत. त्यामुळे यामध्ये जास्त काम करण्याची गरज असल्याचं आमच्या निदर्शनास आलं. खाद्यतेलाची जी इंडस्ट्री आहे. त्यामध्ये पॅकेजिंग असेल किंवा लेबल किंवा ब्रँडवर काम करणाऱ्या आस्थापना. या सर्वांबाबत आमच्या ८ ते १० गोष्टी निदर्शनास आल्या आहेत आणि यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत", असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे.

"पहिली गोष्ट म्हणजे लायसन्स नसणारे अनेकजण आहेत. त्यांच्याकडे लायसन्स नाही, पण ते या क्षेत्रात काम करत आहेत. मात्र, यासाठी लायसन्स बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे लायसन्स नसेल त्यांच्यावर कारवाई होईल", असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

"दुसरं म्हणजे जे खाद्यतेल आहे, त्यामध्ये भेसळ केल्याचे प्रकार आम्हाला आढळून आलेत. मोहरी तेल जे आहे, त्याचंही अनधिकृत मिश्रण करण्याचे प्रकार आढळून आले आहेत. फक्त मोहरीचं तेल विकता येतं, पण मोहरीचं तेल मिश्रण करून विकता येत नाही", अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी सांगितली.

# राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवारांना पुन्हा नोटीस

मुंबई : (स. गांवकरी)



पक्षाध्यक्ष पदाच्या निवडीला दिले आव्हान

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांच्या पक्षाध्यक्षपदाच्या निवडीला आव्हान देणारी नोटीस राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी पुन्हा बजावली आहे. पहिली नोटीस ९ जुलै रोजी पाठवली होती. ज्यामध्ये २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या पक्षाच्या संघटनात्मक निवडणुकांच्या वैधतेला आव्हान देण्यात आले होते. या नोटीसीला १५ दिवसांमध्ये उत्तर दिले नसल्याने त्याची आठवण करुन देणारी ही नोटीस बजावली आहे. पक्षाचे झारखंड प्रदेशाध्यक्ष राहिलेले सिंग हे राष्ट्रवादीशी १५ वर्षांपासून संबंधित आहेत. डिसेंबर २०२३ मध्ये कर्जत येथे झालेल्या पक्षाच्या बैठकीत त्यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती.

२८ फेब्रुवारी, १० मार्च आणि २९ एप्रिल २०२६ रोजी निवडणूक आयोगाला पक्षाकडून पाठवलेली पत्रे मागे घ्यावीत. २६ फेब्रुवारी रोजी झालेली राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक आणि पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात याव्यात. १५ दिवसांच्या मुदतीत मागण्या पूर्ण न केल्यास पक्षाची निवडणूक रद्द करण्यासाठी योग्य नियामक मंचांकडे आम्ही जाण्यास मुक्त आहोत, असे असे नोटीसीमध्ये म्हटले आहे.

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी पक्षाच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीवर आक्षेप घेण्यात आला आहे. ही निवडणूक घटनाबाह्य आहे. या प्रक्रियेसाठी निवडणूक प्राधिकरण नव्हते. तसेच सचिदानंद सिंह आणि इतर राष्ट्रीय प्रतिनिधींना नामांकन भरणे, निवडणूक लढवणे किंवा मतदान करण्याची संधी देण्यात आली नाही, असा नोटीस पाठवणाऱ्या सिंह यांचा आरोप आहे.

राष्ट्रवादी पक्ष सध्या अडचणीत आहे. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा काही केल्या थांबत नाहीत आणि दुसरीकडे पक्षाध्यक्षाच्या निवडीला आव्हान दिले आहे. त्यातच पक्षामध्ये सुनेत्रा -पार्थ आणि पटेल – तटकरे असे दोन तट पडले आहेत. पक्षाचे आमदार संभ्रमात आहेत. त्या पार्श्वभूमीवर पक्षाध्यक्ष निवडीच्या वैधतेला आव्हान मिळाल्याने पक्षाची मोठी कोंडी झाली आहे.

# कसारा, कर्जतकडे जाणारी रेल्वे ठप्प, आसनगाव लोकल ठाकुर्लीत रद्द

मुंबई : (स. गांवकरी)



मध्य रेल्वेच्या कल्याण स्थानकात गुरुवारी अचानक झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे मुंबई लोकल सेवा विस्कळीत झाली. मुंबईहून येणारी एक कल्याण लोकल स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर येताना पॉईंट फेल झाल्याची घटना घडली. या बिघाडामुळे गेल्या तब्बल एका तासापासून कसारा आणि कर्जतच्या दिशेने जाणाऱ्या लोकल गाड्या जागीच थांबवण्यात आल्या. कल्याण स्थानकातील मार्ग पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ऐन गर्दीच्या वेळी हा बिघाड झाल्याने मध्य रेल्वेने आसनगाव लोकल ठाकुर्ली स्थानकातच रद्द करण्याचा निर्णय घेतला. ठाकुर्ली स्थानकात ट्रेन थांबवून त्यातील सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. प्रवाशांना पुढचा प्रवास करण्यासाठी दुसरी उपलब्ध ट्रेनने प्रवास करण्यास सांगण्यात आले. कल्याण स्थानकात डाउन लोकल मार्गावरील पॉइंटमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने गुरुवारी रात्री १०.०५ वाजल्यापासून रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. कल्याण येथील पीटी ११७ मध्ये बिघाड झाल्याने डाउन लोकल लाईनकडून फलाट क्रमांक १ कडे जाणारा मार्ग प्रभावित झाला. या बिघाडामुळे कल्याण स्थानकातील फलाट क्रमांक १, १ए, २ आणि ३ हे डाउन लोकल लाईनसाठी उपलब्ध नसल्याचे रेल्वे नियंत्रण कक्षाकडून कळविण्यात आले.

# पुण्यात अमराठी रिक्षाचालकांवर कारवाई; १० जणांना नोटिसा



पुणे : (स. गांवकरी)

शहरातील अमराठी रिक्षाचालकांना मराठी भाषेचे जुजबी ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आल्यानंतर परिवहन विभागाने त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. मराठीचे प्राथमिक ज्ञान नसलेल्या अमराठी रिक्षाचालकांना नोटिसा बजावून एका महिन्यात मराठीचे आवश्यक जुजबी ज्ञान मिळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कालावधीनंतर त्यांची मराठीची चाचणी घेतली जाणार असून, त्यात पात्र ठरल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाणार आहे. पहिल्याच दिवशी १० रिक्षाचालकांना नोटिसा बजावण्यात आल्या. कारवाईसाठी आठ पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. पुणे शहरात सुमारे दीड लाख रिक्षाचालक असून, त्यापैकी अमराठी रिक्षाचालकांची संख्या सुमारे चार ते पाच हजार असल्याचा अंदाज आहे. मात्र, त्यांचा अधिकृत आकडा परिवहन विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे तपासणीदरम्यान मराठीचे ज्ञान नसलेल्या रिक्षाचालकांची स्वतंत्र नोंद केली जात आहे. याआधी परिवहन विभागाकडून ७२२ अमराठी रिक्षाचालकांना मराठीचे धडे देण्यात आले आहेत. रिक्षाचालक वाहनाची तपासणी, फिटनेस चाचणी, परवाना नूतनीकरण किंवा अन्य कामासाठी परिवहन कार्यालयात आल्यानंतर त्याच्या मराठीच्या ज्ञानाची तपासणी केली जाणार आहे. मराठीचे आवश्यक जुजबी ज्ञान नसल्याचे आढळल्यास त्याला नोटीस बजावून पुढील प्रक्रियेची माहिती दिली जाणार आहे. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शहरातील रिक्षाचालकांची तपासणी सुरू असून, मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना टप्प्याटप्प्याने नोटिसा बजावण्यात येणार आहेत.

**महिनाभरात मराठी शिकणे बंधनकारक**

परिवहन विभागाकडून संबंधित रिक्षाचालकाने नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषेचे आवश्यक जुजबी ज्ञान प्राप्त करावे, तसेच त्याबाबतची चाचणी देण्यासाठी कार्यालयाने अधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. चाचणीत मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान तपासण्यासाठी १६ प्रश्न विचारले जाणार आहेत. चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतर रिक्षाचालकाला मराठीचे प्रमाणपत्र देण्यात येणार असून, त्यानंतरच रिक्षा चालविण्याची परवानगी कायम राहणार आहे. एक महिन्याच्या मुदतीत मराठीचे जुजबी ज्ञान प्राप्त करण्यात रिक्षाचालक अपयशी ठरल्यास त्याच्या वाहनचालक परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाऊ शकतो. पुढील तीन महिन्यांमध्ये मराठी न शिकल्यास बॅज कायमस्वरुपी रद्द केला जाणार आहे.

**- स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे**

# निधन झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना मिळणार लाभ

## सहकार आयुक्तांचे आदेश, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांच्या यादीतील मृत शेतकरी खातेदारांच्या वारसांना लाभ दिला जाणार आहे. याबरोबरच कर्जमुक्तीचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेत वयोवृद्ध व बोटांच्या ठशांचे आधार प्रमाणीकरण करण्यात अडथळे येत असल्याने सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दोन्ही संदर्भातील कार्यपद्धत ठरवून दिली आहे.

यासंदर्भातील आदेश राज्यातील जिल्हाधिकारी, सहकार खात्याचे जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पाठवण्यात आले आहेत. राज्य सरकारने कर्जमुक्ती योजना सुरू केली. या योजनेच्या अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने १६.९६ लाख इतक्या पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध केली आहे. त्यापैकी १३ लाख ४८ हजार लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण झाले आहे. अद्याप राज्यात ३ लाख ४८ हजार लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण प्रक्रिया सुरू आहे. आधार प्रमाणीकरण झाल्याशिवाय कर्जमुक्ती योजनेचा लाभ देता येत नसल्याने त्यामध्ये मृत शेतकरी व वयोवृद्धांच्या बोटांचे ठसे घेण्यामध्ये अडथळे जाणवत आहेत. या संदर्भातील कार्यपद्धत सहकार आयुक्तांनी ठरवून दिली आहे. याचा आदेश काल, बुधवारी जारी करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यात असे एकूण ३४६० खातेदार शेतकरी आहेत. राज्याची संख्या हजारोंनी आहे. मृत शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांना वारस नोंदी करून सुधारित माहिती योजना पोर्टलवर अपलोड करायची आहे. या प्रक्रियेत पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या मृत शेतकऱ्यांची माहिती काढणे व त्यांच्या वारसांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी महाआयटीमार्फत मानक कार्यप्रणाली ठरवून देण्यात आली आहे. कर्जदार शेतकरी आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वी मृत झाल्याची माहिती वारसाकडून प्राप्त झाल्यानंतर प्रचलित धोरणाप्रमाणे वारस नोंद करून घ्यायची आहे. वारस नोंद केल्यानंतर योजनेच्या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुविधेमार्फत वारसाची माहिती अपलोड करायची आहे. मृत शेतकऱ्यांशी संबंधित पूर्वीचे कर्जखाते क्रमांकसह कर्ज खात्याची माहिती अपलोड करायची आहे. त्यापूर्वी जिल्हा बँकेच्या संबंधित शासकीय लेखापरीक्षकांमार्फत कर्ज खात्याची तपासणी करायची आहे. महाआयटीमार्फत संस्करण केल्यानंतर लाभास पात्र असलेल्या कर्जखात्यांची यादी विशिष्ट क्रमांकासह नव्याने आधार प्रमाणीकरण करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी (फार्मर आयडी) आवश्यक राहील. एकापेक्षा अधिक वारसदार असल्यास वारसांच्या हिश्याची प्रमाणात कर्जमुक्तीची रक्कम कर्जखात्यात वर्ग केली जाईल. वारसापत्र असल्याशिवाय त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. एकापेक्षा अधिक वारस असल्यास त्यांना पूर्णांकामध्ये, हिश्यानुसार वाटप केले जाईल, असे आदेशात नमूद केले आहे.

# राज्यातील पहिले एलपीजी मुक्त अन् पीएनजी युक्त गाव

## आशिवने रचला ऊर्जाबदलाचा इतिहास

आशपाक पठाण/ लातूर : (स. गांवकरी)




स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक ऊर्जा वापराच्या दिशेने लातूर जिल्ह्याने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. औसा तालुक्यातील आशिव हे गाव महाराष्ट्रातील पहिले 'एलपीजी मुक्त आणि पीएनजी युक्त' गाव ठरले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, लातूर आणि महानगर गॅस लिमिटेड यांच्या संयुक्त पुढाकारातून गावातील सुमारे १,१०० कुटुंबांना पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) कनेक्शन उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे घरगुती स्वयंपाकासाठी एलपीजी सिलिंडरवर असलेले गावाचे अवलंबित्व संपुष्टात आले आहे. आशिवच्या या कामगिरीमुळे ग्रामीण भागातही शहरांप्रमाणे पाइपलाइनद्वारे घरपोच नैसर्गिक गॅस उपलब्ध होऊ शकतो, हे अधोरेखित झाले आहे. सिलिंडरची नोंदणी, वितरणाची प्रतीक्षा, सिलिंडर आणण्यासाठीची धावपळ आणि साठवणुकीची चिंता यापासून ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात सुटका झाली आहे. काही महिन्यांपूर्वी एलपीजी पुरवठ्याच्या अडचणींचा परिणाम ग्रामीण भागातील कुटुंबांवरही जाणवत होता. सिलिंडर संपल्यानंतर नवीन सिलिंडर मिळेपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असे. मात्र आशिवने या पारंपरिक व्यवस्थेला पर्याय म्हणून पाइपलाइनद्वारे नैसर्गिक गॅस स्वीकारला. मार्च २०२६ मध्ये गावातील सुमारे १,१०० घरांपैकी जवळपास ९०० घरांना पाइपलाइनद्वारे २४ तास नैसर्गिक गॅस पुरवठा सुरू झाला होता. आता उर्वरित कुटुंबांनाही जोडण्या उपलब्ध करून देत आशिवने संपूर्ण गावाला पीएनजीच्या जाळ्यात आणण्याचा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अवसरी खुर्द येथे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

मंचर (स. गांवकरी) : मंचर पोलीस स्टेशन हद्दीतील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, अवसरी खुर्द येथे आज दिनांक 20/08/2026 रोजी दुपारी 15:15 ते 16:30 वाजेपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांसाठी अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शनपर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अंमली पदार्थांपासून दूर राहून व्यसनमुक्त व निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी "ड्रग्ज मुक्त गाव" या अभियानाच्या अनुषंगाने अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक अथवा सेवन याबाबतची माहिती पोलिसांना देऊन अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. अंमली पदार्थांविरोधात समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी "SAY NO TO DRUGS" – अंमली पदार्थ विरोधी शपथ घेतली व व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला. सदर कार्यक्रमास शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद तसेच सुमारे 400 ते 450 विद्यार्थी उपस्थित होते.



## मुलीच्या हत्येचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून तीव्र निषेध!

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी व संतापजनक घटना घडली. या घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करून पीडित बालिकेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीच्या वतीने ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांना देण्यात आले. या प्रकरणाचा तपास जलदगतीने, निष्पक्षपणे आणि कोणत्याही दबावाशिवाय करण्यात यावा, तसेच आरोपीवर संबंधित कायद्यानुसार कठोर कारवाई करून प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पीडित बालिकेच्या कुटुंबीयांना तातडीने शासकीय मदत व आवश्यक संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या होणे ही समाजासाठी अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाईसोबतच महिला व बालिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना आणि व्यापक जनजागृती करण्याची गरज असल्याचे पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पिंपळवंडी व परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना वाढवून अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी पोलिस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीच्या महिला अध्यक्षा रंजना घोलप, अध्यक्ष नयन डुंबरे, संपर्क प्रमुख रवी गजे, वकील शिवानी पन्हाळे, पूजा शिंदे तसेच महिला सदस्या उपस्थित होत्या. पीडित बालिकेला न्याय मिळावा आणि दोषी व्यक्तीला कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी, ही पत्रकार संघाची ठाम भूमिका असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्वागताध्यक्ष पदी महेश इंगळे यांची निवड



अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्वागताध्यक्षपदी श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पुणे येथे पुढील वर्षी २८ ते ३१ जानेवारी २०२७ अखेर होणाऱ्या १०० व्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने राज्यभरात ९९ नांदी साहित्य संमेलने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यापैकी ग्रंथपाल नांदी साहित्य संमेलन अक्कलकोट येथे येत्या २५ ऑगस्ट रोजी होणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी महेश इंगळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, अक्कलकोट शाखेच्या बैठकीत ही निवड करण्यात आली असल्याची माहिती शाखेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी दिली. महेश इंगळे हे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष असून विद्यमान नगरसेवक आहेत. त्यांनी नगराध्यक्ष पदाची जबाबदारीही सांभाळली आहे. विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांच्या निवडीबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी आणि स्विमींग ग्रुपचे अप्पू मालक पराणे, ओंकारेश्वर उटगे, विद्याधर गुरव, विश्वनाथ देवरमनी, मनोज जगताप, कुमार हतुरे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, श्रीमंत खसगी, सचिन किरनळ्ळी, सिद्धराम बिडवे, माशाळे साहेब, सुरेश शटगार, संतोष जवळगे सर, दत्ता कटारे, श्रीशैल गवंडी, तुषार मोरे, अंकुश केत, रमेश शिंदे आदीसह देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, चंद्रकांत गवंडी आदींसह नागरिकांनी नगरसेवक महेश इंगळे यांचे अभिनंदन केले आहे.

## प्लॅटिनमआरएक्समुळे देशात कुठूनही पालकांची मासिक औषधे मागवणे शक्य

PlatinumRx

बंगळुरू (स. गांवकरी) : नोकरी किंवा व्यवसायानिमित्त वेगवेगळ्या शहरांमध्ये राहणाऱ्या तरुण व्यावसायिकांना त्यांच्या पालकांची नियमित औषधे घरपोच मागवता यावीत, यासाठी प्लॅटिनमआरएक्स हे व्यासपीठ सुविधा देत आहे. कंपनीच्या माहितीनुसार, या माध्यमातून नियमित औषधांच्या खर्चात ६० टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते. या व्यासपीठावर डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांमधील समान औषधी घटक आणि गुणवत्तेची परवडणारी पर्यायी औषधे उपलब्ध करून दिली जातात.







# प्रजापिता ब्रह्माकुमारी परिवाराच्यावतीने रक्षाबंधनाचा स्नेहसोहळा!

ठाणे : (स. गांवकरी)

हिंदुस्तानातील गोरगरीब, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सदैव खुले असलेले एन. के. टी. ट्रस्टच्या ठाणे येथील कार्यालयात रक्षाबंधनाचा स्नेहसोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि बंधुभाव जपणाऱ्या या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी प्रजापित ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय कोपरगाव येथील परिवाराच्या वतीने एन. के. टी. ट्रस्टचे शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांना प्रेमपूर्वक राखी बांधून औक्षण करण्यात आले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिण-भावाच्या पवित्र नात्याचे महत्त्व अधोरेखित करत सामाजिक एकोपा आणि परस्पर स्नेहाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी



उपस्थित मान्यवरांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय परिवाराच्या उपक्रमांचे कौतुक केले. समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने मदतीचा हात पुढे करणाऱ्या एन. के. टी. ट्रस्टच्या कार्याचीही यावेळी प्रशंसा करण्यात आली. समाजात प्रेम, आपुलकी, मानवता आणि सेवाभाव वाढीस लागावा, तसेच प्रत्येकाने सामाजिक जबाबदारी जपावी, असा संदेश या स्नेहसोहळ्यातून देण्यात आला.

साधेपणा आणि आपुलकीने पार पडलेल्या या रक्षाबंधन कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी संस्थांनी अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील बंधुभाव अधिक दृढ करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## सिंधुदुर्गमध्ये 'गाव तिथे उद्योजक' अभियानाचा शुभारंभ

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रीकल्चरचे कमिटी मेंबर आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले की महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या 'गाव तिथे उद्योजक' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ सिंधुदुर्ग जिल्ह्यात मा. ना. नितेश राणे, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री आणि आमदार निलेश राणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. 'गाव तिथे उद्योजक' ही महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष मा. रविंद्र माणगावे यांची संकल्पना असून, ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देत प्रत्येक गावात उद्योजक घडविण्याचे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. कोकण पातळीवर उपाध्यक्ष डॉ. संतोष राणे यांच्या विशेष प्रयत्नांतून या अभियानाचा सिंधुदुर्गमध्ये



शुभारंभ होत आहे. ग्रामीण भागातील युवकांना उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देत गावागावात उद्योजक निर्माण करण्याच्या या अभियानाला आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन मा. ना. नितेश राणे यांनी दिले. अशा प्रकारचे अभियान ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी अत्यंत गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र चेंबरचे ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर आणि वरिष्ठ उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी उपाध्यक्षा डॉ. धनश्री हरदास, सुनिता फाल्गुने , सर्व पदाधिकारी यांच्यासह महाराष्ट्र चेंबरचे गव्हर्निंग कौन्सिल मेंबर्स व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रतिमा कुलकर्णी यांना मधुरजग फाउंडेशनचा पुरस्कार प्रदान

पुणे : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील एकल महिलांच्या प्रश्नांवर काम करून त्यांच्या पुनर्वसनासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या प्रतिमा कुलकर्णी यांच्या कार्याची दखल घेत मधुरजग फाउंडेशनतर्फे ५० हजार रुपयांचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी गिरीवन रिसॉर्ट, कोलवण, मुळशी, पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकोले तालुक्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित तसेच विविध कारणांमुळे एकट्या जीवन जगणाऱ्या महिलांच्या प्रश्नांना समजून घेत त्यांना सन्मानाने जगण्यासाठी आधार देण्याचे काम प्रतिमा कुलकर्णी यांच्या माध्यमातून सुरू आहे. केवळ मदत न करता या महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने उभे करण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून केला जात आहे. या कार्यक्रमाला 'मिळून साऱ्याजणी'च्या




संपादिका डॉ. गीताली वि. मं. तसेच लेखक, अभ्यासक, राजकीय विश्लेषक व अभिनेते प्रा. अजित अभ्यंकर यांची प्रमुख उपस्थिती होती. दोघांनीही उपस्थितांशी मनोगत व्यक्त करत सामाजिक संवेदनशीलता, स्त्रियांचे प्रश्न आणि समाजातील वंचित घटकांसाठी सुरू असलेल्या कामाचे महत्त्व अधोरेखित केले. मधुरजग फाउंडेशनचे संस्थापक मा. जगदीशजी काबरे यांनी अकोले तालुक्यातील एकल महिलांसाठी सुरू असलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. प्रतिमा कुलकर्णी यांनी महिलांच्या वेदना समजून घेत त्यांना केवळ सहानुभूती न देता प्रत्यक्ष मदत, पुनर्वसन आणि स्वावलंबनाच्या दिशेने नेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी गौरवोद्गार काढले. या पुरस्काराने मला आणि कुटुंबियांना आनंद झाला आहे. आपण करत असलेल्या कामाची दखल समाज घेत असतो याची प्रचिती अशा प्रसंगातून मिळत राहते. पुरस्कार न मिळाल्याने काम थांबत नाही पण मिळाला तर काम करायला जोम मात्र निश्चित येतो.असे प्रतिमा कुलकर्णी यांनी मनोगतात व्यक्त केले.

याप्रसंगी अन्वर राजन, दिग्दर्शक सुनील सुकथनकर, दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ, हेरंब कुलकर्णी,सिस्कॉमचे राजेंद्र धारणकर, सचिन गुरव, संजय पुजारी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना साळुंके यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ब्राईट फाउंडेशनचे कुमार नागे यांनी केले.

## नशामुक्त युवा, विकसित भारत संकल्प अभियान उत्साहात संपन्न

आळेफाटा : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित, समर्थ आयुर्वेदिक महाविद्यालय व रिसर्च सेंटर, बेल्हे समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग आणि समर्थ कॉलेज ऑफ नर्सिंग बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने'नशामुक्त युवा, विकसित भारत 'संकल्प अभियान उत्साहात संपन्न झाले. तरुणाईला व्यसनांपासून दूर ठेवून निरोगी, सक्षम आणि सुदृढ समाजनिर्मिती करण्याच्या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले.

आजच्या काळात देशातील तरुण पिढी विविध प्रकारच्या व्यसनांच्या विळख्यात अडकत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. व्यसनांमुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनही प्रभावित होते. त्यामुळे युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करून त्यांना सकारात्मक जीवनमूल्यांची प्रेरणा देणे ही




काळाची गरज आहे. याच उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा आळेफाटा येथील स्नेहा मॅडम आणि महेश सर यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी व्यसन, ताणतणाव आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्यांबाबत मार्गदर्शन केले. निरोगी जीवनशैली, सकारात्मक विचार, आत्मसंयम आणि दृढ इच्छाशक्ती यांच्या माध्यमातून व्यसनांपासून दूर राहता येते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी विद्यार्थ्यांना 'नशामुक्तीची प्रतिज्ञा' देण्यात आली. व्यसनांपासून स्वतः दूर राहण्याबरोबरच आपल्या मित्रपरिवारात, कुटुंबात आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. अभियानाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली. हातात व्यसनमुक्तीचे संदेश असलेले फलक घेऊन तसेच विविध घोषवाक्ये देत विद्यार्थ्यांनी परिसरातून रॅली काढली. 'व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार', 'नशामुक्त युवा—विकसित भारत', 'व्यसनमुक्त समाज, सक्षम समाज' अशा प्रभावी घोषणांनी संपूर्ण समर्थ परिसर दुमदुमून गेला. रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधनाचे प्रभावी कार्य केले.

व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी केवळ वैयक्तिक प्रयत्न पुरेसे नसून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाचा सामूहिक सहभाग आवश्यक आहे. युवकांनी आपल्या ऊर्जेचा आणि क्षमतेचा उपयोग शिक्षण, कौशल्यविकास, क्रीडा, संशोधन व राष्ट्रनिर्मितीसाठी करावा, असा संदेश या अभियानातून देण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रदीप गाडेकर यांनी या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. या उपक्रमासाठी समर्थ आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय लोंढे, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब भुतकर, ऐश्वर्या गटकळ, आकाश क्षीरसागर, यशवंत फापाळे, तसेच डॉ. श्रवंती तोडचिरकर, डॉ. जयश्री मते, डॉ. कृतिका कांबळे, डॉ. स्नेहल गायकवाड आणि यांनी विशेष प्रयत्न केले. डॉ.मधुसूदन कुऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रा. मानसी गवळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पेप्सिको इंडियाच्या पुणे प्लांटची २५ वर्षे पूर्ण

रांजणगाव : (स. गांवकरी)

pepsico
Food. Drinks. Smiles.

स्नॅक्स आणि पेये क्षेत्रातील प्रमुख कंपनी पेप्सिको इंडियाच्या पुणे उत्पादक प्रकल्पाने २५ वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला आहे. २००१ मध्ये सुरू झालेल्या रांजणगाव येथील या १५ एकरच्या प्रकल्पात आतापर्यंत ६०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली असून, कंपनीच्या 'भारतात, भारतासाठी' या बांधिलकीचे हे महत्त्वाचे उदाहरण ठरले आहे. वर्षाला ६२,१०० टन उत्पादन क्षमता असलेल्या या प्रकल्पात लेज, कुरकुरे, चीटोस, सॉलिड मस्ती आणि अंकल चिप्स या उत्पादनांची निर्मिती केली जाते. या उत्पादनांचा पुरवठा प्रामुख्याने पश्चिम आणि दक्षिण भारतातील ग्राहकांना केला जातो. पुणे प्रकल्प हा शेतकरी, स्थानिक समुदाय, कर्मचारी, उद्योग भागीदार आणि महाराष्ट्र सरकारसोबतच्या दीर्घकालीन सहकार्याचे उदाहरण आहे. या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या माध्यमातून सुमारे १,४०० लोकांच्या उपजीविकेला हातभार लागला असून, महाराष्ट्रातील स्थानिक पुरवठादार आणि पूरक उद्योगांच्या वाढीलाही चालना मिळाली आहे. पेप्सिको इंडिया आणि दक्षिण आशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जागृत कोटेचा म्हणाले, "गेल्या २५ वर्षांपासून पुणे हा पेप्सिको इंडियाच्या विकासातील महत्त्वाचा भाग आहे. भारतातील हा आमचा दुसरा खाद्यपदार्थ निर्मिती प्रकल्प आहे. या प्रकल्पाची क्षमता आता सहा पटीने वाढली असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या माध्यमातून जवळपास १,४०० लोकांच्या उपजीविकेला हातभार लागला आहे."

# हटली हागणदारी उभारली प्रशस्त आणि सुसज्ज शाळा

### नगरसेविका श्रीदेवी फुलारी यांनी केला परिसराचा कायापालट

सोलापूर : (स. गांवकरी)

येथील कोणापुरे चाळ हा झोपडपट्टीचा भाग या भागातील मुलांसाठी सोलापूर महानगरपालिकेने 50 वर्षांपूर्वी शाळा सुरू केली होती परंतु कालांतराने सोलापूर महानगरपालिकेच्या शाळा बंद पडत गेल्या. तशी ही शाळा ही बंद पडली. आणि या शाळेची इमारत कंगाल आणि भकास बनली या शाळेच्या जागेला स्थानिक नागरिकांनी हागणदारी केले मुतारी केले शाळेच्या जागेत अवैध प्रकार सुरू झाले. परंतु या गोष्टीची खंत या भागाच्या कर्तव्य दक्ष नगरसेविका श्रीदेवी जॉन फुलारी यांना बसू देत नव्हती. या खंत मधूनच त्यांनी





मनाशी पक्का निर्णय केला की आपल्या या भागातील शाळेचा विकास करायचा आणि परिसराचा कायापालट करायचे हे मनाशी ठरवून ठाकले आणि त्यांनी खरेच तसे करून ही दाखविले. आज या ठिकाणी सुंदर शाळा आणि सुंदर परिसर झाला असून हागणदारीची जागा आता शाळेने घेतली आहे. आणि हागणदारी बनलेल्या शाळेला पूर्वीचे गत वैभव प्राप्त झाले आहे.

हागणदारी हटली आहे आणि सुसज्ज शाळा उभी राहिली आहे नगरसेविका श्रीदेवी फुलारी यांनी परिसराचा कायापालट करून आपले कर्तव्य सिद्ध केले आहे.

कोनापुरे चाळ परिसर पालिकेची शाळा क्रमांक २५ मैदान बनले होते. हागणदारी शाळेचे वर्ग झाले होते शौचालयं शाळेच्या गेट मधून आत मध्ये पाऊल ठेवणं म्हणजे बनलं होते. आव्हान अहो ही शाळा कसली तर हागणदारीच बनलेली होती सर्वत्र दुर्गंधी, दुरवस्था या दुर्दैवात भर म्हणजे शाळेच्या इमारतीचही काही खरं न्हवतं शिवाय आजूबाजूची अतिक्रमनं शाळेच्या परिसराला गिळू पाहत होती शहराच्या मध्यवर्ती भागातील कामगार कष्टकऱ्यांच्या परिसरातील पालिका शाळेची अशी होती केविलवाणी अवस्था होती. हागणदारीच्या जागी दिसून येत आहे ते सपाटीकरण झालेलं प्रशस्त मैदान मैदानावर खेळणारे मुलं मुली आता थोडी शाळेची इमारत पहा सुंदर अशी रंग रंगोटी भिंतीवर रेखाटण्यात आलेले कार्टून्स नकाशे पाढे सुविचार मनमोहक अशी निसर्ग चित्र हे सगळे काही शाळेची हागणदारी बनलेली पाहून पेटून उठलेल्या नगरसेविका फुलारे यांनी आपल्या जबर इच्छाशक्तीच्या बळावर नवलाईन परिपूर्ण अशी शाळा उभारून शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

दिसणारे बाहेरचे दृश्य इथले वर्गही अशाच नवलाईनं आता नटलेत, प्रत्येक वर्गाची प्रसन्न करणारी रंग रंगोटी, इथेही आकर्षक अशी चित्रं, ठळक असा फळा, वर्गात चांगल्या फरशा, भरपूर प्रकाश, नव्या खिडक्या, अगदी पंख्याची देखील करण्यात आली आहे. सोय विद्यार्थी, परिसरातील नागरिक इतकंच काय पाहणारा प्रत्येकजण अवाक होतो. इथे काही महिन्यांपूर्वी हागणदारी माजलेली होती शाळेची दयनीय न्हवे तर अत्यंत करुण अवस्था झाली होती. यावर कोणाचा विश्वासच बसणार नाही. हागणदारीच्या ठिकाणी आज सुंदर आणि प्रशस्त अशी शाळा उभी राहिली आहे.



# गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

## नवी मुंबईत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा प्रेरणादायी गौरव सोहळा!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. त्याच उपक्रमांतर्गत नवी मुंबई येथे गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी इयत्ता दहावी, बारावी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, वह्या व पेन देऊन गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "आई-वडिलांनी आपल्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट आणि केलेले योगदान लक्षात ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यात मोठे ध्येय निश्चित करावे. भविष्यात आदर्श अधिकारी, उद्योजक किंवा व्यावसायिक बनून समाजासाठी योगदान द्यावे," असे आवाहन केले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यामागील उद्देश केवळ कौतुक नसून, भविष्यात सक्षम झाल्यानंतर त्यांनीही गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करावा, हा सामाजिक बांधिलकीचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार संघाच्या माध्यमातून गेल्या २७ वर्षांपासून राज्यभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. पालकांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मार्गदर्शन घेण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार कल्याण हनवते, जे. के. पोळ, राजू वीर, महेश जाधव, अवधेश यादव, आबू कुरेशी, ज्येष्ठ विधिज्ञ संगीता शेट्टी, समाजसेविका अस्मिता दशरथ चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत पोपळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मंत्रालय संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ गांवकरीचे प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या वाढदिवसानिमित्त शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. पत्रकारांनी समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत जनतेचे प्रश्न शासनदरबारी मांडावेत आणि समाजहिताची पत्रकारिता करावी, असे आवाहन दशरथ चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना चहा-नाश्ता देऊन सोहळ्याची सांगता करण्यात आली.



- 'उद्याचा आदर्श अधिकारी बना' आई-वडिलांचे स्वप्न साकार करा; गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ. विश्वासराव आरोटे यांचे प्रेरणादायी आवाहन!
- पत्रकार विष्णू बुरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने राज्य पत्रकार संघाच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळा संपन्न
- पत्रकारांना छत्र्यांचे वाटप व साहित्य वितरण
- विद्यार्थ्यांना राज्य पत्रकार संघाने सन्मान करून मुंबई नगरीत दाखविला समाजसेवेचा सन्मान
- दशरथ चव्हाण यांच्या टीमचे राज्यभरात कौतुक

# महादेव महाराज गुळीक यांच्या सेवाभावाला ठाण्यात सलाम!

## पोलीस अधिकारी ते वारकरी कीर्तनकार : एन.के.टी.ट्रस्टच्या व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्यावतीने सत्कार!

ठाणे : (स. गांवकरी)

'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याला जागत पोलीस सेवेत कार्यरत असतानाही वारकरी संप्रदायाची परंपरा जपणारे आणि दरवर्षी पंधरा दिवस पायी वारी करणारे ठाणे शहरातील पोलीस अधिकारी ह.भ.प. महादेव महाराज गुळीक यांचा एन. के. टी. ट्रस्टच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. सातारा जिल्ह्यातील दहिवडी येथील शेतकरी कुटुंबातून आलेले महादेव महाराज गुळीक हे पोलीस अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडतानाच अध्यात्मिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान देत आहेत. विशेष म्हणजे वारीदरम्यान तसेच विविध ठिकाणी ते कीर्तनाची सेवा कोणतेही मानधन न घेता मोफत देतात. पोलीस अधिकारी म्हणून कर्तव्य बजावत असताना समाजसेवा, वारकरी संप्रदायाची परंपरा आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय साधणाऱ्या गुळीक यांच्या कार्याची दखल घेत एन. के. टी. ट्रस्टचे शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, "पोलिसांनी माणसात देव पाहिला पाहिजे. आपल्याकडे मदतीसाठी येणारा प्रत्येक व्यक्ती हा देवरूप आहे, या भावनेतून त्याचे काम झाले पाहिजे. अनेक ठिकाणी पोलीस समोरील माणसाची अडचण समजून न घेतल्याने नागरिक नाराज होतात. मात्र तुमच्यासारखी माणसे खाकी वर्दीतही संवेदनशीलता जपत आहेत, ही निश्चितच समाधानाची बाब आहे."



"तुमच्यासारख्या खाकीतील माणसांमुळे आजही वारकरी संप्रदायाचा विचार आणि सर्वसामान्य जनतेची सेवा यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. अशा अधिकाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे प्रश्न नक्कीच मार्गी लागतील," असा विश्वासही शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी एन. के. टी. ट्रस्टच्या वतीने ह.भ.प. महादेव महाराज गुळीक यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पिंपळेश्वर धर्मसेवा संस्थेचे अध्यक्ष वसंतराव बुचके, ढोकेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबासाहेब तरे, काकडेवाडीचे सरपंच अशोकराव वाळुंज, ह.भ.प. वाळुंज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पोलीस सेवेतील कर्तव्य बजावत असतानाच दरवर्षी पायी वारी करून वारकरी संप्रदायाची सेवा करणे आणि विविध ठिकाणी निःशुल्क कीर्तनातून समाजप्रबोधन करणे, ही महादेव महाराज गुळीक यांची विशेष ओळख आहे. त्यांच्या या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत समाजात सेवाभाव, माणुसकी आणि अध्यात्माची ज्योत अशीच तेवत ठेवण्याचे आवाहन केले.

## दत्तकला संस्थेच्या सचिवेला पोलीस कोठडी; अध्यक्ष रामदास झोळ फरार

पुणे : (स. गांवकरी)

राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदूबाबा मनोहर भोसले प्रकरणात सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) मोठे यश मिळाले आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथील दत्तकला शिक्षण संस्थेची सचिव माया रामदास झोळ हिच्यासह राजेंद्र गोकुळ हुंबे आणि लक्ष्मीकांत मन्मथ लिगाडे या तिघांना न्यायालयाने २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास झोळ फरार असून, त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक १९२/२०२६ नुसार, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(२), ३१८(४), ३(५), वाढीव कलम १११(२)(ब) तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३(२) आणि ३(३) अन्वये २३ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुख्य आरोपी मनोहर चंद्रकांत भोसले आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात एकूण सहा गुन्हे दाखल आहेत.



- भोंदूबाबा मनोहर भोसले प्रकरणात एसआयटीची कारवाई; माया झोळसह तिघांना २१ ऑगस्टपर्यंत कोठडी

# अक्कलकोटमध्ये साकारणार १,००० घरांचा गृहप्रकल्प !

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र सरकारची मंजुरी

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना अल्प किंमतीत हक्काचे आणि पक्के घर मिळावे, यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अक्कलकोट शहरात १,००० घरांच्या गृहप्रकल्पाला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे.

या मंजुरीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी समाधान व्यक्त केले. या गृहप्रकल्पात केवळ घरांची उभारणी न करता परिसरात रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आणि वीजपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे लाभार्थी कुटुंबांना सुरक्षित आणि चांगल्या वातावरणात राहण्याची सुविधा मिळणार आहे. याशिवाय प्रकल्पाच्या माध्यमातून कौशल्य विकास, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींवरही भर देण्यात येणार आहे. त्यामुळे घरासोबतच लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे. अक्कलकोटमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारा हा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार आहे.



अक्कलकोट शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना अल्प किंमतीत हक्काचे आणि पक्के घर मिळावे, यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेल्या पाठपुराव्याला आता यश आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १,००० घरांच्या गृहप्रकल्पाला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली असून, अनेक कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न आता साकार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रकल्प केवळ घरांच्या उभारणीपुरता मर्यादित राहणार नाही. प्रकल्प परिसरात रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आणि वीजपुरवठ्यासह आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे लाभार्थी कुटुंबांना केवळ पक्के घरच नाही, तर सुरक्षित आणि चांगल्या वातावरणात राहण्याची सुविधाही मिळणार आहे.

यासोबतच कौशल्य विकास, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींवरही भर देण्यात येणार आहे. म्हणजेच घरासोबत कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणाचीही वाट तयार होणार आहे.

> अक्कलकोटमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा हा प्रकल्प असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
> **- श्री सचिन कल्याणशेट्टी**
> **आमदार अक्कलकोट विधानसभा मतदारसंघ**

# आळेफाटा पोलीस स्टेशन येथे महिला दक्षता समितीचा एल्गार

## पोलीस अधीक्षक संदीप गिल यांचा ताफा अडवून मोर्चा

आळेफाटा : (स. गांवकरी)

पिंपळवंडी येथील अल्पवयीन चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या मागणीसाठी आज आळेफाटा पोलीस स्टेशन येथे महिला दक्षता समितीच्या वतीने जोरदार मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल यांचा ताफा आळेफाटा येथे दाखल होताच महिला कार्यकर्त्यांनी ताफा अडवून आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास महिला दक्षता समितीच्या शेकडो महिला कार्यकर्त्या हातात निषेधाचे फलक घेऊन पोलीस स्टेशन समोर जमल्या होत्या. "महिलांना सुरक्षा मिळालीच पाहिजे", "पीडित कुटुंबाला न्याय द्या" अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पोलीस अधीक्षक संदीप गिल हे पिंपळवंडी घटनेच्या तपासाच्या आढावा बैठकीसाठी आळेफाटा पोलीस स्टेशन येथे येत असताना महिलांनी त्यांची गाडी अडवली. महिला दक्षता समितीच्या प्रमुख मागण्या :-१) पिंपळवंडी प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी आणि खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा.२) आळेफाटा परिसरात महिलांसाठी स्वतंत्र महिला दक्षता गस्त पथक सुरू करावे.३) शाळा-कॉलेज परिसरात छेडछाड रोखण्यासाठी पोलीस बंदोबस्त वाढवावा.४)पीडित कुटुंबाला शासनाकडून तातडीने २० लाखांची आर्थिक मदत द्यावी.




यावेळी पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी मोर्चेकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, "ही घटना अत्यंत गंभीर आहे. आरोपीला अटक केली असून आम्ही पोक्सो कायद्यांतर्गत अतिशय कडक कलमे लावली आहेत. १५ दिवसात दोषारोपपत्र दाखल करून फास्ट ट्रॅकवर केस चालवली जाईल. महिलांच्या सुरक्षेबाबत कोणतीही हयगय केली जाणार नाही. तुमच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल." पोलीस अधीक्षकांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर सुमारे एक तास चाललेला मोर्चा शांततेत मागे घेण्यात आला. याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, आळेफाटाचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, महिला दक्षता समितीच्या तालुकाध्यक्षा वैशाली देवकर तसेच मोठ्या संख्येने महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.या आंदोलनामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. आळेफाटा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## राजूर नं. २ येथे वृक्षारोपण व संवर्धन कार्यक्रम उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी वातावरण निर्मिती तसेच स्थानिक वनौषधी व विविध उपयुक्त वृक्षांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या पुढाकाराने बुधवार, दि.:-१९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आरोग्य पथक,राजूर नं.२ येथे वृक्षारोपण व संवर्धन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या उपक्रमांतर्गत डिसेंट फाउंडेशनच्या वतीने आरोग्य पथकाच्या परिसरासाठी शंभरहून अधिक विविध वनौषधी,फळझाडे व फुल झाडांची रोपे उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी वन विभाग जुन्नर,आंबेगाव,कृषितज्ञ डॉ. संतोष सहाणे व नंदकिशोर खेडकर यांनी देखील सहकार्य केले आरोग्य मंदिरांच्या परिसरात हरित व आरोग्य दायी वातावरण निर्माण करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. तसेच लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची नियमित देखभाल,पाणी देणे व त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही उपस्थितांनी स्वीकारली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### 'बीड फाइल्स'मध्ये तृप्ती देसाईंची भूमिका ठरणार लक्षवेधी

पुणे (स. गांवकरी) : बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था आणि या परिस्थितीमुळे सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता यावर भाष्य करणारा 'बीड फाइल्स' हा नवा मराठी चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर येत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्याशी संबंधित व्यक्तिरेखा आणि सामाजिक वास्तवावर विशेष प्रकाश टाकला जाणार असल्याने चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. डॉ. डोईफोडे फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मिती होत असलेल्या 'बीड फाइल्स'मध्ये बीडमधील गुन्हेगारीच्या घटनांमागील सामाजिक आणि व्यवस्थात्मक वास्तवाचा वेध घेण्यात येणार आहे. गुन्हेगारीला खतपाणी घालणारी परिस्थिती, व्यवस्थेतील त्रुटी आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत. चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरचे नुकतेच अनावरण करण्यात आले. या पोस्टरमधून चित्रपटाच्या गंभीर आणि वास्तववादी आशयाची झलक पाहायला मिळते. विशेषतः तृप्ती देसाई यांना केंद्रस्थानी ठेवून मांडण्यात येणारा सामाजिक दृष्टिकोन चित्रपटाला वेगळी धार देणार असल्याचे दिसून येत आहे. डॉ. शशिकांत डोईफोडे हे चित्रपटाचे निर्माते असून शिवराज बांगर सह-निर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन गणेश शिंदे करणार आहेत. चित्रपटातील इतर कलाकारांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तृप्ती देसाईंची भूमिका नेमकी कशा स्वरूपाची असेल आणि बीडमधील वास्तवाचे चित्रण कोणत्या पद्धतीने केले जाणार, याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. मनोरंजनासोबतच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न करणारा 'बीड फाइल्स' हा चित्रपट बीडमधील गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधण्याची शक्यता आहे.

### सॅमसंगकडून भारतातील टॉप ४० युवा नवोन्मेषकांची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : सॅमसंग इंडियाने आपल्या प्रमुख युवा नवोन्मेष कार्यक्रम 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो' च्या २०२६च्या आवृत्तीतील टॉप ४० उपांत्य फेरीतील संघांची घोषणा केली आहे. देशातील तरुणांना त्यांच्या आजूबाजूच्या समस्या ओळखून तंत्रज्ञान, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून त्यांचे नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी या कार्यक्रमाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदा भारतात या कार्यक्रमाची पाचवी आवृत्ती होत असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना त्यात सहभागी होता येते.

# जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची पाल आश्रमाला भेट

## बापूजींच्या समाधी दर्शनाने भारावले आध्यात्मिक वातावरण !

रावेर : (स. गांवकरी)

सातपुड्याच्या दुर्गम भागातील पाल येथील श्री वृंदावन धाम आश्रमाचे संस्थापक सद्गुरू संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांचा ५८वा अवतरण दिवस १५ ऑगस्ट रोजी भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी पाल येथील आश्रमाला भेट देऊन ,परमपूज्य संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांच्या समाधीचे दर्शन घेतले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी यावेळी श्री हरी गोपाल गोशाळा, वृद्धाश्रम, सांदिपनी गुरुकुल, सत्संग पांडाल, भोजन पांडाल तसेच राधा विहार आश्रम परिसराची पाहणी केली. आश्रमाच्या विविध सामाजिक, आध्यात्मिक व सेवाभावी उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली. तसेच संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांच्या जीवनकार्याविषयीही माहिती घेतली. यावेळी उपवनसंरक्षक अधिकारी सौरीश सहाय, यावल प्रकल्प अधिकारी अरुण पवार, प्रभारी तहसीलदार संजय तायडे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे, ज्येष्ठ पत्रकार दीपक नगरे, संत श्री श्याम चैतन्यजी महाराज, श्री लखन महाराज, ऋषी चैतन्य महाराज, उत्तम पवार, अनारसिंग चव्हाण, रघुनाथ चव्हाण, धनराज पवार, दशरथ पवार, हरी चव्हाण, पिंटू पवार, संजय पवार, सुरेश पवार, डॉ. संजय चव्हाण (खरगोन), पूनमचंद जाधव, विकास चव्हाण, नंदकिशोर चव्हाण, गणेश भोई, छोटूलाल चव्हाण, दिलीप जाधव, मनोहर चव्हाण, प्रकाश पवार, दिनेश चव्हाण, सुनील राठोड, शीतल बुनकर, काळू पवार, राधेश्याम चव्हाण, नवीन पवार तसेच तलाठी सलीम तडवी, कोतवाल आमीन तडवी आदी उपस्थित होते. परमपूज्य संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांच्या अवतरण दिनानिमित्त श्री वृंदावन धाम आश्रमातून भक्तीसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर रावेर तालुका भक्तीफेरी काढण्यात आली. भक्तीफेरीत भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत परिसर भक्तिमय केला. आश्रमात ध्यान, प्रार्थना तसेच भगवद्गीतेचे पठण करण्यात आले. विद्यमान गादीपती श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत श्री श्याम चैतन्यजी महाराज होते. त्यांनी आपल्या सत्संगातून पूज्य बापूजींचे जीवनचरित्र, समाजासाठी त्यांनी दिलेल्या शिकवणी तसेच मानवसेवेचा संदेश उपस्थित साधकांना दिला. प्रत्येकाने व्यसनांपासून दूर राहून निर्व्यसनी, सात्त्विक व सदाचारी जीवन जगावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी उपस्थित भाविकांनी संतांच्या विचारांचे श्रवण करत आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक आरती करण्यात आली. त्यानंतर पाल येथील चव्हाण परिवाराच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजींच्या ५८व्या अवतरण दिनानिमित्त पाल येथील श्री वृंदावन धाम आश्रमात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी घेतलेले बापूजींच्या समाधीचे दर्शन यामुळे या धार्मिक व आध्यात्मिक सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# तामसा–नांदेड मार्गावरील कथित अवैध वाहतुकीवरून आरटीओच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## मासिक 1,500 रुपयांच्या ‘फिक्स’ वसुलीची चर्चा; विनाक्रमांक वाळू टिप्परवर कारवाईची मागणी

तामसा : (स. गांवकरी)

तामसा–नांदेड मार्गावर सुरू असल्याचा आरोप होत असलेल्या कथित अवैध प्रवासी व मालवाहतुकीवर आरटीओ विभागाच्या कारवाईबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. काही वाहनधारकांकडून दरमहा ठराविक १,५०० रुपयांची रक्कम घेतली जाते, अशी चर्चा परिसरात सुरू असून, या चर्चेची अधिकृत चौकशी होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अवैध वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरटीओचे फिरते पथक कार्यरत असतानाही तामसा–नांदेड मार्गावर नियमबाह्य वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे हे पथक नेमके कोणत्या प्रकारच्या वाहनांवर कारवाई करते, किती वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर सातत्याने कारवाई का होत नाही, असे प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. दरम्यान, दरमहा १,५०० रुपयांच्या कथित ‘फिक्स’ वसुलीबाबत अद्याप कोणताही अधिकृत पुरावा समोर आलेला नाही. तसेच आरटीओ विभागाकडूनही या आरोपांवर अधिकृत स्पष्टीकरण उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे या चर्चेची सत्यता तपासण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. तामसा परिसरात विनाक्रमांक वाळूचे टिप्पर सार्वजनिक रस्त्यावर धावत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. वाहनांची नोंदणी, विमा, परवाना, वाहनाची कागदपत्रे तसेच वाहतुकीसंबंधी आवश्यक नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी संबंधित विभागाकडून होणे अपेक्षित आहे.

जर विनाक्रमांक वाहने प्रत्यक्षात सार्वजनिक रस्त्यावर धावत असतील, तर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, किती वाहने तपासण्यात आली आणि किती दंड वसूल करण्यात आला, याची माहिती आरटीओ विभागाने जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




# प्रतिगामी शक्तींच्या विरोधात पेटून उठण्याची गरज : उल्हास पवार

पुणे : (स. गांवकरी)

देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्तराखंडात केवळ दलित म्हणून अत्यंत विद्वान, कर्तृत्ववान आणि राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते असलेल्या मल्लिकार्जुन खर्गे यांचा केवळ दलित म्हणून करण्यात आलेला अपमान सहन करता कामा नये. सामाजिक समतेसाठी आणि प्रतिगामी शक्तींना विरोध करण्यासाठी पेटून उठण्याची गरज आहे, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विचारवंत उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने भारतीय संविधान आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा अपमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तीच्या विरोधात पुणे शहर आणि जिल्ह्यातील सर्वपक्षीय संविधानवादी नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात उल्हास पवार यांच्यासह माजी आमदार जयदेव गायकवाड, काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष, आंदोलनाचे मुख्य समन्वयक कुणाल राजगुरू, माजी नगरसेविका लता राजगुरू, विठ्ठल गायकवाड, शैलेंद्र मोरे, संग्राम रोहम, वसंत साळवे, रोहिदास गायकवाड, रवींद्र माळवदकर आदी सर्वपक्षीय नेते मंडळी आणि नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मल्लिकार्जुन खर्गे यांना लहानपणापासून सामाजिक विषमतेचे चटके सोसावे लागले. त्यांच्या कुटुंबातील पाच जणांना जाळून मारण्यात आले.




## थोडक्यात बातम्या...

### सईद अहमद यांची सह दुय्यम निबंधकपदी नियुक्ती; पदभार स्वीकारला




हिमायतनगर (स. गांवकरी) : हिमायतनगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात प्रशासकीय कामकाजाला नवी दिशा मिळाली असून, सईद अहमद यांनी सह दुय्यम निबंधक म्हणून दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. दस्तऐवज नोंदणी, मालमत्ता व्यवहार, विविध करारनामे तसेच नागरिकांशी संबंधित नोंदणीच्या कामकाजामध्ये दुय्यम निबंधक कार्यालयाची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे कार्यालयातील कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख राहावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पदभार स्वीकारल्यानंतर सईद अहमद यांनी कार्यालयीन कामकाजाची माहिती घेतली. नागरिकांची कामे नियमाप्रमाणे आणि वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. नोंदणी प्रक्रियेदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, तसेच आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी कार्यालयीन पातळीवर विशेष लक्ष देण्याची अपेक्षा आहे. नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे कार्यालयातील प्रलंबित कामांना गती मिळण्याबरोबरच नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये अधिक सुसूत्रता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना जमीन, घर, खरेदी-विक्री तसेच इतर दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात वारंवार येणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांना सुलभ आणि पारदर्शक सेवा मिळणे महत्त्वाचे ठरते. दरम्यान, सईद अहमद यांच्या सह दुय्यम निबंधक पदावरील नियुक्तीबद्दल त्यांचे सहकारी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी शुभेच्छा दिल्या असून, त्यांच्या कार्यकाळात कार्यालयीन प्रशासन अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### राजीव गांधी स्मारक समितीतर्फे जयंतीनिमित्त अभिवादन



पुणे (स. गांवकरी) : भारताच्या विकासाचा पाया घालणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी देशासाठी मोठे योगदान दिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाच्या प्रगतीचा पाया घातला, तर माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीला आणि तंत्रज्ञानाच्या विकासाला नवी दिशा दिली. राजीव गांधी यांच्या विचारांवर वाटचाल करून त्यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध राहणे आवश्यक आहे. त्यांचे सकारात्मक, आधुनिक आणि विकासाभिमुख विचार आजही देशासाठी मार्गदर्शक असून त्यांची देशाला गरज आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव तथा महाराष्ट्राचे सहप्रभारी बी. संदीप यांनी केले. राजीव गांधी स्मारक समितीतर्फे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कात्रज येथील राजीव गांधी प्राणीसंग्रहालयासमोरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बी. संदीप बोलत होते. राजीव गांधी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

### पुण्यात बार्टीच्या संशोधक विद्यार्थ्यांचा संताप



पुणे (स. गांवकरी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांनी पुकारलेले बेमुदत धरणे आंदोलन आता अधिक उग्र झाले आहे. 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'च्या नेतृत्वाखाली कालपासून पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयाबाहेर सुरू असलेल्या या आंदोलनात आज विद्यार्थ्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. शासनाने लागू केलेला २०२३ चा ‘सर्वंकष समान धोरण’ शासन निर्णय (GR) पूर्णपणे संविधानविरोधी असून यामुळे अनुसूचित जातींचा विशेष घटनात्मक दर्जा धोक्यात येत असल्याचा घणाघात करत विद्यार्थ्यांनी या अन्यायकारक जीआरची जाहीर होळी केली. पीएच.डी. करणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठीच सरकारने या जाचक अटी लादल्या असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सामाजिक न्याय विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय टाळाटाळ केली जात आहे. बार्टीच्या माध्यमातून उच्चशिक्षण घेणाऱ्या ५८ जातींमधील विद्यार्थ्यांची संख्या केवळ १०० वर आणून सरकारने पीएच.डी. शिक्षणाचे केलेले 'रेशनिंग' अत्यंत निंदनीय आहे, अशी तीव्र भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ही सरकारची दलितविरोधी मानसिकता स्पष्ट करते, अशी टीकाही यावेळी करण्यात आली. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंबेडकरवादी चळवळीतील प्रमुख नेते राहुल डंबाळे, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. राहुल ससाणे, स्वप्निल नारबाग, राहुल नगटिळक, राजरत्न बलखांडे, सुरेखा वासनिक, नितीन आंधळे, मानसीताई वानखेडे, आदी मान्यवर आज सलग दुसऱ्या दिवशीही आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झाले होते. त्यांच्यासह राज्यभरातून आलेले शेकडो संशोधक विद्यार्थी या आंदोलनात ताकदीने उतरले आहेत. काल आंदोलनाच्या पहिल्या दिवशी बार्टीच्या निबंधक सुचिता शिंदे यांनी बार्टी कार्यालयात विद्यार्थी आणि मान्यवरांशी सविस्तर चर्चा केली होती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मिळणार कर्जमुक्तीचा लाभ; स्वागत आईनेनिवार यांचे आवाहन

किनवट : (स. गांवकरी)





राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या, मात्र आधार प्रमाणीकरणापूर्वी मरण पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना आता कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने अशा कर्जखात्यांबाबत मानक कार्यप्रणाली (SOP) निश्चित केली असून, किनवट परिसरातील संबंधित शेतकरी कुटुंबीयांनी तातडीने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन भारतीय जनता पार्टी किनवट शहराचे मंडळ अध्यक्ष स्वागत केशवराव आईनेनिवार यांनी केले आहे. राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाइन प्रणालीद्वारे केली जात असून 'महाआयटी'मार्फत १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यापैकी १३.४८ लाख लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण वेगाने सुरू आहे.

पहिल्या यादीतील काही शेतकरी आधार प्रमाणीकरण पूर्ण होण्यापूर्वीच मरण पावल्याची बाब बँकांच्या निदर्शनास आली होती. नियमानुसार आधार प्रमाणीकरणाशिवाय कर्जमुक्तीचा लाभ देणे शक्य नसल्यामुळे, शासनाने अशा मृत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर वारसांची कायदेशीर नोंद करून त्यांची सुधारित माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्याची नवी कार्यपद्धती जाहीर केली आहे. या निर्णयामुळे आधार प्रमाणीकरणाअभावी लाभापासून वंचित राहण्याची भीती असलेल्या शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. योजनेच्या निकषांनुसार पात्र वारसांना कर्जमुक्तीचा लाभ थेट मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजप शहर मंडळ अध्यक्ष स्वागत केशवराव आईनेनिवार यांनी सांगितले की, "तालुक्यातील ज्या पात्र शेतकऱ्यांचा आधार प्रमाणीकरणापूर्वी मृत्यू झाला आहे, त्यांच्या वारसांनी संबंधित बँकेशी त्वरित संपर्क साधावा. वारस नोंदणीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक माहिती पोर्टलवर अद्ययावत करून घ्यावी, जेणेकरून शासनाच्या या योजनेचा पूर्ण लाभ कुटुंबाला वेळेत मिळू शकेल."

# महिला कर्मचाऱ्याच्या छेडछाड प्रकरणाने नांदेड हादरले

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड येथील तहसील कार्यालयामध्ये एका महिला महसूल सेवक कर्मचाऱ्याची छेडछाड आणि छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी जिल्हा महसूल सेवक संघटना, नांदेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे दोषी कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. कारवाई न झाल्यास येत्या काही दिवसांत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर तीव्र 'कामबंद' आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. कार्यालयात मानसिक आणि लज्जास्पद छळ मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला कर्मचारी सध्या आवक- जावक शाखा तहसील कार्यालय नांदेड येथे कार्यरत आहेत,याच कार्यालयात कार्यरत असलेले महसूल सहाय्यक बळीराम लक्ष्मणराव बैनवाड यांच्यावर या महिला कर्मचाऱ्याचा मानसिक छळ करणे, तसेच असभ्य व लज्जास्पद वर्तन करून छेडछाड केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडित महिलेने या त्रासाला कंटाळून अखेर दि. १८/०८/२०२६ रोजी संघटनेकडे न्याय मागितला होता. यापूर्वी वरिष्ठांना दोन वेळा तोंडी कळवूनही कोणतीही दखल न घेतली गेल्याचे समोर आले आहे. महसूल संघटनेच्या मुख्य मागण्या:या गंभीर घटनेनंतर जिल्हा महसूल सेवक संघटनेने जिल्हाधिकारी निवेदन देऊन खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत. दोषी कर्मचारी बळीराम लक्ष्मणराव बैनवाड (महसूल सहाय्यक) यांना तातडीने निलंबित करण्यात यावे, अंतर्गत चौकशी,या प्रकरणाची कार्यालयांतर्गत महिला तक्रार निवारण समिती मार्फत निष्पक्ष आणितातडीने चौकशी व्हावी.

# अरमूर अपघाताची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करा – अशोक नेम्मानिवार

किनवट : (स. गांवकरी)



किनवट व परिसरातील ६० ते ६५ महिला भाविकांना घेऊन हैदराबादकडे जात असताना १३ ऑगस्ट रोजी तेलंगणातील अरमुर तालुक्यातील गोविंदपूर येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर झालेल्या भीषण बस अपघाताची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक मुकुंदराव नेम्मानिवार यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या दुर्घटनेत अशोक नेम्मानिवार यांच्या पत्नी सौ. सुजाता अशोक नेम्मानिवार आणि त्यांच्या भगिनी सौ. माधवी किरण तिरमनवार (किनवटकर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य महिला भाविक जखमी झाल्या. अपघातानंतर राष्ट्रीय महामार्गावरही जखमींना सुमारे दीड तास तातडीची मदत मिळाली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच बसचे टायर फुटल्यानंतर ती बस सुमारे दोन तास चुकीच्या दिशेने उभी होती. त्यामुळे बसची फिटनेस, टायरची गुणवत्ता, तांत्रिक तपासणी तसेच चालक व वाहनमालकाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. सोबतच संबंधित वाहतूक यंत्रणा, राष्ट्रीय महामार्गाची आपत्कालीन व्यवस्था तसेच चिन्ना जियार स्वामी यांच्या आश्रम व व्यवस्थापनाची भूमिकाही तपासावी, अशी मागणी अशोक नेम्मानिवार यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेलंगणा मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी पाठपुरावा करावा आणि दोषी आढळणाऱ्या व्यक्ती किंवा संबंधित यंत्रणांवर कठोर कारवाई करावी. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना व जखमी भाविकांना योग्य शासकीय मदत मिळवून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी मिळताच डॉ. भारती पवार सप्तश्रृंगी देवीच्या चरणी नतमस्तक

## कळवणमध्ये कार्यकर्त्यांचा जल्लोष

कळवण : (स. गांवकरी)

कळवण भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा झाल्यानंतर माजी केंद्रीय मंत्री तथा नवनियुक्त भाजप राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ. भारती पवार यांनी मायभूमीत दाखल होताच थेट श्री क्षेत्र सप्तश्रृंगी गडावर जाऊन आई सप्तश्रृंगी देवीचे दर्शन घेतले. देवीच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी आपल्या नव्या जबाबदारीसाठी आशीर्वाद घेतले.

डॉ.भारती पवार यांच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्तीनंतर प्रथमच कळवण तालुक्यात आगमन झाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. नांदुरी येथे कळवण तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे जोरदार स्वागत केले.यावेळी भारती ताई,तुम आगे बढो’, ‘भारतीय जनता पार्टीचा विजय असो’ अशा घोषणांनी नांदुरी परिसर दुमदुमून गेला. यानंतर डॉ.भारती पवार यांनी सप्तश्रृंगी गडावर जाऊन आई सप्तश्रृंगी देवीचे मनोभावे दर्शन घेतले. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी मिळाल्यानंतर मायभूमीतील आराध्य दैवताचे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केल्याने कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

दर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना डॉ.भारती पवार म्हणाल्या, “माझ्यासारख्या एका आदिवासी महिलेला भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने राष्ट्रीय पातळीवर एवढी मोठी जबाबदारी दिली,ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आगामी काळात गावखेड्यांपासून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे.” पुढे त्या म्हणाल्या की, देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी,केंद्रीय नेतृत्वातील अमितभाई शाह,राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने दिलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील जनतेपर्यंत पक्षाची विचारधारा व विकासाची कामे पोहोचविण्यासाठी संघटनात्मक पातळीवर अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आदिवासी समाजातून राष्ट्रीय नेतृत्वापर्यंतचा प्रवास डॉ.भारती पवार यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी झालेली नियुक्ती ही कळवणसह नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. स्थानिक पातळीवर काम करत राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचलेल्या डॉ.पवार यांच्या या नियुक्तीमुळे कळवण तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या स्वागतप्रसंगी भाजप तालुकाध्यक्ष दीपक खैरनार, तालुकाध्यक्ष दादाजी मोरे,शहर अध्यक्ष बाळा पगार ,दिपक वेढणे,बाळु आण्णा यांनी प्रतिक्रिया दिल्या,यांच्यासह कळवण तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ‘ऑडिओमेट्री सर्व्हिसेस अँड स्पीच थेरपी केअर’चे उद्घाटन

## आधुनिक श्रवण तपासणी व स्पीच थेरपी सुविधा आता नाशिकमध्ये एकाच छताखाली

नाशिक : (स. गांवकरी)



श्रवणदोषाचे अचूक निदान, वेळेवर उपचार तसेच बोलणे आणि संवादाशी संबंधित अडचणींवर योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिकच्या ईएनटी विभागात ‘ऑडिओमेट्री सर्व्हिसेस अँड स्पीच थेरपी केअर’ या आधुनिक सुविधेचे आज उद्घाटन करण्यात आले. या सुविधेमुळे अत्याधुनिक श्रवण तपासणी तसेच स्पीच आणि लँग्वेज थेरपी सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. ही सुविधा ईएनटी शल्यचिकित्सक डॉ. पंकज भट आणि क्लिनिकल ऑडिओलॉजिस्ट डॉ. सोहन चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहणार आहे. श्रवणक्षमता कमी होणे, कानाशी संबंधित समस्या, लहान मुलांमधील श्रवणदोष, बोलण्यास उशीर होणे, उच्चार स्पष्ट न होणे तसेच इतर स्पीच व कम्युनिकेशनशी संबंधित अडचणींचे मूल्यांकन आणि आवश्यक थेरपी येथे उपलब्ध होणार आहे. डॉ. पंकज भट म्हणाले, “विशेषतः लहान मुलांमध्ये श्रवणदोष वेळेत ओळखला नाही तर त्याचा परिणाम त्यांच्या बोलण्याच्या, भाषिक आणि शैक्षणिक विकासावर होऊ शकतो. त्यामुळे मुलाला आवाजाला प्रतिसाद न देणे, बोलण्यास उशीर होणे किंवा उच्चार स्पष्ट न होणे यांसारखी लक्षणे दिसल्यास पालकांनी वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. प्रौढांमध्येही श्रवणक्षमता कमी होण्याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी तपासणी व उपचार घेणे आवश्यक आहे.”

डॉ. सोहन चौहान म्हणाले, “प्रत्येक रुग्णामध्ये श्रवणदोषाची तीव्रता आणि त्याचा संवादावर होणारा परिणाम वेगळा असतो. त्यामुळे योग्य ऑडिओलॉजिकल मूल्यांकन महत्त्वाचे आहे. ऑडिओमेट्रीच्या माध्यमातून श्रवणक्षमता अचूकपणे तपासून त्यानुसार पुढील उपचार, श्रवण पुनर्वसन किंवा स्पीच थेरपीची आवश्यकता निश्चित करता येते. विशेषतः मुलांमध्ये समस्या लवकर ओळखून थेरपी सुरू केल्यास त्यांच्या संवादकौशल्याच्या विकासाला मोठी मदत होते.”

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड श्री. अनुप त्रिपाठी म्हणाले, “रुग्णांना आधुनिक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा नाशिकमध्येच उपलब्ध करून देणे हे आमचे सातत्यपूर्ण ध्येय आहे. या नव्या सुविधेमुळे श्रवण आणि संवादाशी संबंधित समस्यांसाठी अधिक समन्वयित सेवा उपलब्ध होणार आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील रुग्णांना याचा लाभ मिळेल.”

या उद्घाटनप्रसंगी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे सर्व न्यूरोलॉजिस्ट, तसेच नाशिक शहरातील फॅमिली फिजिशियन असोसिएशनचे अध्यक्ष आणि सदस्य उपस्थित होते. त्यांनी या नव्या सुविधेचे स्वागत करून अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलच्या या नव्या सुविधेमुळे नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना ENT, Hearing आणि Speech Care क्षेत्रातील आधुनिक व एकात्मिक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४८। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## व्यवहारिक मराठी न येणाऱ्या १,२६८ चालकांना नोटिस; महिनाभरात मराठी शिका, अन्यथा बॅज निलंबित

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी आजपासून राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठीचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुंबई महानगर क्षेत्रात आज झालेल्या तपासणीत ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. उर्वरित राज्यातील आकडेवारीनुसार आतापर्यंत ४,२२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.



ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. तपासणीदरम्यान चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान तपासले जाईल. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येणार असली, तरी त्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात विहित मुदतीनंतर बॅज निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे.

मराठी शिकण्यासाठी संधी आहे; नियम टाळण्यासाठी मुभा नाही, असा स्पष्ट संदेश परिवहन विभागाने या मोहिमेच्या माध्यमातून दिला आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

## वाशेरे घाटात वाघिणीचा थरार

### जखमी बछड्याला अज्ञात वाहनाची धडक, पोलिसांनी तीन तास केले संरक्षण!

अकोले (समर्थ गांवकरी)

वाशेरे घाटात बुधवारी रात्री दहाच्या सुमारास वाघिणीच्या बछड्याला अज्ञात वाहनाने धडक दिल्याची घटना घडली. धडकेनंतर जखमी बछडा रस्त्यालगत तडफडत होता. बछड्याची अवस्था पाहून वाघीण चवताळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. याच मार्गावरून दुचाकी व इतर वाहनांची मोठी वर्दळ सुरू असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली होती.



घटनेची माहिती मिळताच अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सुमारे तीन तास वाघीण व तिच्या बछड्यांवर लक्ष ठेवत रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना सुरक्षित अंतरावरून शांतपणे पुढे जाण्याच्या सूचना दिल्या. टॉर्चच्या प्रकाशाच्या सहाय्याने परिसरावर लक्ष ठेवत पोलिसांनी प्रसंगावधान राखले. दरम्यान, वाघिणीने जखमी बछड्याला रस्त्याच्या कडेला असलेल्या शेताच्या दिशेने नेले. दरम्यान, घटनेची माहिती वन विभागाचे अधिकारी आनंद पाटील यांना मिळताच त्यांनी तातडीने पथक घटनास्थळी पाठविले. वन विभागाच्या पथकाने जखमी बछड्याला ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी सुरक्षित ठिकाणी हलविले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे रात्रीच्या या थरारक प्रसंगात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. वाघीण परिसरात असण्याची शक्यता लक्षात घेता नागरिक, वाहनचालक, दुचाकीस्वार तसेच सकाळी फिरण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांनी वाशेरे घाटातून प्रवास करताना विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी केले आहे.

## जळगाव महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई

जळगाव (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) जळगाव मंडळातील वीज वितरण व्यवस्थेतील ढिसाळ कारभाराचा ठपका ठेवत अधीक्षक अभियंता विनोद चंद्रकांत पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. वीज चोरीची प्रलंबित प्रकरणे, वाढती थकबाकी आणि नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरच्या समस्यांवर अपेक्षित कारवाई न झाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे. कल्याण येथील कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी याबाबत आदेश जारी केला आहे. जळगाव मंडळाच्या वीज वितरण व्यवस्थेचा वरिष्ठ पातळीवरून आढावा घेतल्यानंतर अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याचे आदेशात म्हटले आहे.




प्रभावी कारवाई न झाल्याचा ठपका

जळगाव मंडळाच्या कार्यक्षेत्रात वीज चोरीची तब्बल २ हजार १६९ प्रकरणे समोर आली होती. या प्रकरणांमध्ये नियमानुसार कारवाई करून महावितरणचा महसूल सुरक्षित करणे अपेक्षित होते. मात्र, या प्रकरणांवर प्रभावी कारवाई न झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. वीज चोरीमुळे महावितरणच्या महसुलावर थेट परिणाम होत असताना एवढ्या मोठ्या संख्येने प्रकरणे प्रलंबित राहणे ही गंभीर बाब मानली जात आहे. जळगाव मंडळातील ग्राहकांकडील वीज बिलांची थकबाकी ६७ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. थकबाकी वसुलीसाठी प्रभावी नियोजन आणि सातत्याने पाठपुरावा अपेक्षित असताना अपेक्षित परिणाम साधता आला नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. मोठ्या प्रमाणातील थकबाकीमुळे कंपनीच्या महसुलावर परिणाम होत असल्याने या बाबीचीही निलंबनाच्या कारवाईत गंभीर दखल घेण्यात आली आहे.

## मिहान इंडियाकडून विविध उपक्रमांसाठी १ कोटी ३५ लाख रुपयांची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते धनादेशांचे वितरण




नागपूर (समर्थ गांवकरी)

मिहान इंडिया लिमिटेडतर्फे सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकहिताच्या उपक्रमांसाठी सीएसआर निधीचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध संस्था आणि नागपूर महानगरपालिकेला एकूण १ कोटी ३५ लाख रुपयांचे धनादेश आज रामगिरी या मुख्यमंत्री निवासस्थानी प्रदान करण्यात आले.

यामध्ये जीविका फाऊंडेशनला सर्व्हायकल कॅन्सरच्या लसीकरण अभियानासाठी २५ लाख रुपये देण्यात आले. नागपूर महानगरपालिकेला सांडपाणी व्यवस्थापनासाठी ३५ लाख रुपये, तर महिला सक्षमीकरण प्रकल्पासाठी ३५ लाख रुपये देण्यात आले आहेत. तसेच शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणासाठी १० लाख रुपयांचा निधी महापालिकेला देण्यात आला. याशिवाय वूमन्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर येथील महाविद्यालयीन इमारत आणि सभागृहाच्या नूतनीकरणासाठी ३० लाख रुपयांचा सीएसआर निधी देण्यात आला. या निधीमुळे आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि नागरी सुविधांच्या विकासाला हातभार लागणार आहे.

या वेळी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे, गटनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्यासह मिहान इंडिया लिमिटेडचे अधिकारी उपस्थित होते.

## महात्मा ज्योतिबा फुले समग्र वायय ग्रंथाचा सात भाषांमध्ये अनुवाद करणार

### सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांची घोषणा

मुंबई (समर्थ गांवकरी)

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र वाययाचा ग्रंथ हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या सात भाषांमध्ये अनुवाद करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी आज प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे एक दिवशीय अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.



मराठीतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा विविध भाषांमध्ये अनुवाद तसेच विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. यावेळी मंत्री ॲड. शेलार यांनी मराठी भाषेतील दर्जेदार वायय अन्य भाषांमध्ये गेले पाहिजे तसेच अन्य भाषांमधील वायय ही आपल्या भाषेत आले पाहिजे असे सांगितले.

## वावी येथे 'एक शाम साई के नाम' भक्तिमय संगीत कार्यक्रम उत्साहात संपन्न!

शिर्डी (समर्थ गांवकरी)

समाज कल्याण न्यास, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १९ वर्ष सलग भिवंडी ते शिर्डी पायी दिंडी सोहळा साई पालखी निवारा येथे सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी 'एक शाम साई के नाम' या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. साईबाबांच्या भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला साईभक्त व परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.हजारो साई भक्त या ठिकाणी येतात विशेष म्हणजे या दिंडीतील सर्व खर्च विना पावती समाज कल्याण या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धर्म सेवक सोन्या पाटील स्वतः करत असतात या पालखीमुळे हजारो भाविक भक्तगण पायी प्रवास करून बाबांकडे येत असतात या पालखीचे नेतृत्व साईबाबा के दिवाने जे के पाटील हे करत असतात सर्व मनोभावाने एकत्र येऊन गुण्यागोविंदाने या ठिकाणी बाबांचा जप करतात जे का रंजले गांजले त्याशी आपले म्हणावे या उक्तीप्रमाणे १९ वर्ष पासून सुरू असलेला हा सोहळा संपूर्ण राज्याला एक परभणी ठरणार आहे सोन्या पाटील हा सोनेरी माणूस ज्याच्याजवळ स्पर्श होतो त्याला तो नक्कीच एक भक्कम साथीदार व बाबांच्या रूपाने तो नेहमी साई भक्तांची सेवा करताना दिसून येतो समाज कल्याण यास ही







संस्था हिंदुस्थानात एक नामांकित संस्था असून या संस्थेने ३६५ दिवसांपैकी २६५ दिवस आपल्या दारातून दानधर्म करण्याचा संकल्प केला हा संकल्प आज पुढे नेताना त्यांच्या कुटुंबातील मुले देखील हाच संकल्प घेऊन पुढे चाललेले आहेत धर्म सेवक सोन्या पाटील यांच्या परिवारातील सर्व परिवार हा भक्तांच्या सेवेसाठी अहोरात्र परिश्रम घेत असतो हाच साई पालखी सोहळा हा जीवनातील आपला एक परभणी सोहळा असल्याचे ते सांगत असतात भिवंडी ते शिर्डी यादरम्यान अनेक ठिकाणी जोरदार स्वागत केले जाते अनेक भाविक भक्तजन व दादांचे चाहते या पालखीला आपल्या ठिकाणी साईबाबांची पालखी आपल्या दारी येणार हा अननउत्सव अनेक भावी भक्तांना एक उत्साह देणारा ठरत आहे

कार्यक्रमात नाशिक येथील आदिशक्ती यल्लम्मा गायन पार्टीने भक्तिगीतांचे सादरीकरण केले. शाहीर बॉबी पाथरे, नाना वीर, शाहीर अजय गायकवाड तसेच ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध गायिका सौ. हर्षाली पाटील यांनी आपल्या गायनकलेतून उपस्थित साईभक्तांना मंत्रमुग्ध केले. भक्तिसंगीताच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

## मासेमारी बंदी कालावधीत मच्छिमारांना मिळणार आर्थिक मदत

### मत्स्य विभागाचा वित्त विभागाकडे प्रस्ताव; ८ हजार ८२९ मच्छीमार कुटुंबांना होणार लाभ

मुंबई (समर्थ गांवकरी)

पावसाळ्यात दोन ते अडीच महिन्यांच्या मासेमारी बंदीच्या काळात मच्छीमार कुटुंबांसमोर निर्माण होणारा उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी विशेष नियोजन केले आहे. आंध्र प्रदेशच्या धर्तीवर राज्यातील गरजू मच्छीमारांना प्रत्येकी २० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव मत्स्य विभागाकडून वित्त विभागाकडे पाठवण्यात आला आहे.



राज्यात दरवर्षी १ जून ते ३१ जुलै हा पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी असतो. यंदा हा कालावधी १५ दिवसांनी वाढविण्यात आल्याने १५ ऑगस्टपर्यंत समुद्रात मासेमारी बंद होती. या काळात पारंपरिक मच्छीमारांचे उत्पन्नाचे स्रोत पूर्णपणे बंद होतात. विद्यमान योजनेनुसार पात्र मच्छीमारांना केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून वार्षिक ४ हजार ५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. मात्र, वाढती महागाई आणि ही अपुरी मदत लक्षात घेता, यात वाढ करून ती २० हजार रुपये करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

ही मदत सरसकट सर्व मच्छीमारांना देण्याऐवजी खरोखर गरजू असलेल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर राज्य सरकारचा विशेष भर आहे. लाडकी बहीण योजनेच्या अनुभवातून धडा घेत, सरकार आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संपूर्ण खबरदारी घेत आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात किनारी जिल्ह्यांतील मच्छीमारांचा या योजनेत समावेश करण्यात आला असून, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) या संस्थेकडून गरजू मच्छीमारांचे सर्वेक्षण केले जात आहे. यात रायगड जिल्ह्यात सर्वाधिक लाभार्थ्यांची नोंद झाली असून त्यानंतर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीचा क्रमांक लागतो.

मच्छीमारी करणारे काही व्यावसायिक मच्छीमार पर्ससीन नेटने मासेमारी करतात आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत. त्यामुळे ज्यांना खरोखर आवश्यकता आहे, अशाच पात्र आणि गरजू मच्छीमारांना ही आर्थिक मदत दिली जाईल, असे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट केले आहे.

# साईनगरी शिर्डीतून संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या 'एक राखी जवानांसाठी'च्या रक्षा रथाचे प्रस्थान

## एक लाख राख्या निघाल्या वीर सैनिकांच्या मनगटावर बांधण्यासाठी

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या 'एक राखी जवानांसाठी' अभियानाच्या सहाव्या वर्षातील रक्षा रथाचे साईनगरी शिर्डी येथून गुजरात-कच्छ (भारत-पाकिस्तान) सीमेच्या दिशेने प्रस्थान झाले. श्री साईबाबांच्या पावन भूमीतून रवाना झालेला हा रक्षा रथ माता-भगिनींनी जवानांसाठी प्रेमाने पाठविलेल्या राख्या, विद्यार्थ्यांची देशभक्ती आणि जवानांप्रती कृतज्ञतेची भावना घेऊन सीमेच्या दिशेने निघाला.

या उपक्रमाला शिर्डीकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माता-भगिनी, विद्यार्थी, साईभक्त, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत जवानांसाठी राख्या जमा केल्या. त्यामुळे शिर्डीतील या प्रस्थान सोहळ्यात भक्ती आणि शक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

यावेळी काशीका नंदगिरी महाराजांच्या आश्रमातील विद्यार्थी व शिक्षकांनी पावली आणि भजन सादर करून भक्तिमय वातावरण निर्माण केले. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन सादर केले. आत्मा मालिक शैक्षणिक संस्थानच्या वतीने प्रमुख पाहुण्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. साईनाथ म ाध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जवानांसाठी राख्या पाठवल्या. साईभक्त माता-भगिनींनीही राख्या जमा करून या अभियानाला उत्स्फूर्त साथ दिली.

यावेळी संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आमदार विवेक कोल्हे म्हणाले, देशाच्या सीमेवर कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावणाऱ्या जवानांना आपण विसरलेलो नाही, संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी आहे, हा विश्वास देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठी राखी पाठविणे म्हणजे त्यांच्या शौर्याला आणि त्यागाला कृतज्ञतेने वंदन करण्याची भावना आहे. शिर्डीच्या पावन भूमीतून निघालेला हा रक्षा रथ माता-भगिनींचे प्रेम, विद्यार्थ्यांची देशभक्ती आणि प्रत्येक भारतीयाच्या म नातील जवानांप्रती असलेली कृतज्ञता घेऊन सीमेपर्यंत पोहोचणार आहे. गेल्या पाच वर्षांत या अभियानाला मिळालेला प्रतिसाद सातत्याने वाढत असून, यंदाच्या सहाव्या वर्षीही नागरिकांनी दाखविलेला उत्स्फूर्त सहभाग निश्चितच प्रेरणादायी आहे.

या प्रसंगी ज्येष्ठ कार्यकर्ते उत्तमराव मते, माजी नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर, भाजपा माजी शहराध्यक्ष सचिन शिंदे, भाजपा युवा मोर्चाचे माजी शहराध्यक्ष चेतन कोते, युवा मोर्चाचे माजी जिल्हा सरचिटणीस नरेश सुराणा, गणेश जाधव, राहाता तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन चौगुले, राहाता नगर परिषदेचे नगरसेवक धनंजय गाडेकर, शिवसेनेचे अमोल गायके, रवींद्र सोनवणे, गणेश सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाबासाहेबदादा डांगे पाटील, साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (IS), नारायणराव कार्ले, भगवानराव टिळेकर, संपत हिंगे, अनिल गाढवे, बाळासाहेब चोळके, नानासाहेब नळे, संजय सरोदे, अनिल बोठे, भाऊसाहेब थेटे, भगवान वाघ, केदार कार्ले, प्रसाद आहेर, नारायण काकड, राजेंद्र लहारे, दिलीप शिरसागर, राजेंद्र आग्रे, एल. एम. डांगे, विजय गाडेकर, गोकुळ ठूबे, सदाशिव गाडेकर, रमेश गागारे, साहिल म्हस्के, विक्रम वाघ, राजेंद्र बाबुळके, आलेश कापसे, अनिल गोरे यांच्यासह साई संस्थानचे कर्मचारी, विविध लोकप्रतिनिधी, सर्वपक्षीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, युवासेवक, भाविक-भक्त, माता-भगिनी आणि शिर्डीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एक राखी जवानो के नाम या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने गेले सहा वर्षांपासून करण्यात येते आहे.या वर्षी शिर्डी ते कच्छ बॉर्डर असा प्रवास हा राखी रथ करणार आहे.गतवर्षी शिर्डी ते श्रीनगर यात्रेदरम्यान सव्वा लाख राखी संकलित झाल्या होत्या. त्याच प्रमाणे उदंड प्रतिसाद यावेळी देखील मिळेल अशी अपेक्षा संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक आ.विवेक कोल्हे यांनी व्यक्त केली.




साईबाबांच्या पावन भूमीतून अध्यात्मिक ऊर्जा घेत अहोरात्र देशसेवा करणाऱ्या सैनिकांच्या प्रति आपला आदरभाव व्यक्त व्हावा या दृष्टीने अशा राष्ट्रभक्तीच्या उपक्रम ाचे विशेष महत्त्व आहे.स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांची आश्रय भूमी म्हणून साईबाबांच्या भूमिकडे पाहिले जाते.१५ लाखाहून अधिक जवान २४ तास डोळ्यात तेल घालून देशाची सीमा जपता आहेत असे कोल्हे म्हणाले व या राखी यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या.

संजीवनी युवा प्रतिष्ठानचे सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असून दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येत आहे व त्याची सुरुवात शिर्डी येथून होते आहे हे आम च्यासाठी आनंदाची बाब आहे.श्री साईबाबा संस्थान नेहमी राष्ट्रप्रेमाच्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. आ.विवेक कोल्हे आणि त्यांच्या सर्व युवासेवकांनी देशाच्या सैनिकांप्रति व त्यांच्या त्यागप्रती जपलेली संवेदनशील भावना मोलाची आहे अशी भावना साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी व्यक्त केली व शुभेच्छा दिल्या.

# समता स्कूलमध्ये योगासन स्पर्धेत युवा कर्तृत्वाने गाठली नवी उंची

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७ वी जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धा २०२६-२७ उत्साह, शिस्त आणि क्रीडाविष्काराच्या वातावरणात १६ व १७ ऑगस्ट २०२६ रोजी समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या स्पर्धेच्या निमित्ताने जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या युवा योगासनपटूंनी विलक्षण लवचिकता, शारीरिक सामर्थ्य, अचूक संतुलन, म ानसिक एकाग्रता आणि आत्मविश्वासाचे प्रभावी दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला समता इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य समीर अत्तार यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच मालपाणी उद्योग सम ूह अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी प्रम ुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पारितोषिक वितरणासाठी शिर्डी नगर परिषदेचे नगरसेवक अमित शेळके, योग प्रशिक्षक उत्तमभाई शहा, अभिजीत शहा, सतीश गुजराथी, महेश थोरात, आदिनाथ ढाकणे, समता पतसंस्थेचे संचालक संदीप कोयटे, समता स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त सौ.स्वाती कोयटे उपस्थित होते.

दरम्यान, समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात दोन दिवस रंगलेल्या या योगासन स्पर्धेमुळे परिसरात उत्साहाचे आणि क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक योगासनासोबतच आर्टिस्टिक योगासन सिंगल, आर्टिस्टिक योगासन पेअर, रिदमिक योगासन पेअर, ट्रेडिशनल ग्रुप आणि आर्टिस्टिक ग्रुप अशा विविध प्रकारांत खेळाडूंनी आपले कौशल्य सादर केले. आसनातील अचूकता, शरीराचा समतोल, लवचिकता, तालबद्धता आणि सादरीकरणातील सफाई यांचा सुरेख मिलाफ प्रत्येक सादरीकरणातून जाणवत होता.

स्पर्धेच्या अंतिम निकालात संगम नेर तालुक्याने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अहिल्यानगर तालुक्याने द्वितीय, तर अकोले तालुक्याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या संघांसह सहभागी सर्व खेळाडूंचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

प्रसंगी संजय मालपाणी म्हणाले की, योग ही केवळ शरीर तंदुरुस्तीची साधना नसून मनाला स्थैर्य, विचारांना सकारात्मक दिशा आणि जीवनाला शिस्त देणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी



योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा. समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना योग आणि क्रीडा क्षेत्रात मिळणाऱ्या संधी कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाला निश्चितच आकार मिळतो. तसेच त्यांनी समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग व क्रीडा क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे कौतुक करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीला दाद दिली.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगत शिक्षणासोबत योग आणि क्रीडेलाही जीवनाचा भाग बनविण्याचे आवाहन केले. योगामुळे विद्यार्थ्यांम ध्ये शिस्त, संयम, एकाग्रता आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत क्रीडा क्षेत्रातही सातत्याने सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यात ३९;FFS डिजिटल खत वितरण प्रणाली३९;ची प्रभावी अंमलबजावणी करा : जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया

**अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)**

केंद्र शासनाचे रसायन व खत मंत्रालय आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या नवीन ३९;Framework for Fertilizer Sale (FFS)३९; डिजिटल प्रणालीच्या प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची विशेष आढावा बैठक संपन्न झाली.बैठकीम ध्ये FFS प कार्यपद्धती व खत नियोजन,शेतकऱ्यांसाठी पारदर्शक, सुलभ व तंत्रज्ञानाधारित खत वितरण व्यवस्थेवर विशेष भर देणे इ .विषयी चर्चा झाली.

या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे व विविध रासायनिक खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा संघटनेचे प्रतिनिधी छबुराव हराळ यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी ऋऋड डिजिटल प्रणालीची वैशिष्ट्ये व फायदे पिकाच्या गरजेनुसार खत शिफारस (GFR) सातबारा व पीक नोंदीनुसार जमिनीच्या क्षेत्रफळानुसार अचूक खतांचे प्रमाण (उदा. युरिया, डीएपी, एनपीकेएस) ॲपद्वारे सुचविले जाते, ज्यामुळे उत्पादन खर्चात मोठी बचत होईल. सुलभ व पारदर्शक खरेदी व्यवस्था शेतकऱ्यांना वाजवी व शासकीय दरात खते उपलब्ध होऊन कोणत्याही सक्तीशिवाय केवळ आवश्यक खतांचीच खरेदी करणे शक्य होणार आहे. लाईव्ह स्टॉक व केंद्राची निवड (पारदर्शक व स्मार्ट वितरण) शेतकरी दुकानात जाण्यापूर्वीच तालुक्यातील अधिकृत कृषी सेवा केंद्रांमधील उपलब्ध प्रत्यक्ष साठा (Live Inventory) तपासून स्वतःच्या पसंतीचे केंद्र निवडू शकतात.

डिजिटल ठठ पास व प्रतिनिधी सुविधा पवर बुकिंगनंतर मिळणारा ठठ कोड श-झेड वर स्कॅन करून खत मिळेल. शेतकरी स्वतः अथवा अधिकृत प्रतिनिधीद्वारे ३ दिवसांच्या आत खत खरेदी करू शकतात.

जिल्ह्यात ६५,००० मेट्रिक टनांपेक्षा अधिक खतांचा मुबलक साठा उपलब्धः टंचाईची शक्यता नाही तसेच

जिल्ह्यातील परवान्यांचे अद्ययावतीकरण पूर्ण झाले असून उर्वरित प्रकरणांमधील तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया

वेळेत पूर्ण करण्याचे निर्दे श देण्यात आले. तसेच खत वितरणातील पारदर्शकतेसाठी गोदामातील प्रत्यक्ष साठा व

श-झेड मधील डिजिटल साठा नियमितपणे अद्ययावत ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आधुनिक व पारदर्शक खत वितरणासाठी FFS पचा जास्तीत जास्त

वापर करुन आवश्यक असणाऱ्या खतांचे आरक्षण करुन ऐन हंगामात होणारी गैरसोय टाळावे असे आवाहन

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

# रद्दी विक्रीबाबत दरपत्रक पाठवण्याचे आवाहन

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयात असलेली जुनी दैनिक वृत्तपत्र व जुने साप्ताहिक यांची दरपत्रक मागवून विक्री करावयाची आहे. यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळुन ) जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर या नावाने आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २८ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद पाकीटातुन पाठवावे. पाकीटावर रद्दीसाठीचे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा. उशिरा प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. या कार्यालयास प्राप्त होणारी दरपत्रके दिनांक २८ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रक उघडतांना आपण स्वतः अथवा आपला प्रतिनिधी उपस्थित राहु शकतो. दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे. कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, १ ला मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडीरोड, अहिल्यानगर.

# संगमनेरच्या स्वतंत्र आरटीओ कार्यालयाच्या मागणीला 'ब्रेक'; श्रीरामपूरच्या अधिकाऱ्यांचा नकारात्मक अहवाल!

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**




आर्थिक, व्यापारी व सामाजिकदृष्ट्या झपाट्याने विकसित होत असलेल्या संगमनेर तालुक्याला स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मिळावे, या मागणीला श्रीरामपूरच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या नकारात्मक अहवालामुळे मोठा धक्का बसला आहे. संगमनेर व अकोले या दोन्ही तालुक्यांसाठी स्वतंत्र परिवहन कार्यालयाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र, शासनाच्या निकषांचा आधार घेत प्रस्तावास विरोध करण्यात आल्याने या अहवालाच्या वस्तुनिष्ठतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संगमनेर व अकोले तालुक्यातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

संगमनेर हे जिल्ह्यातील प्रमुख व्यापारी व आर्थिक केंद्र असून पुणे-नाशिक महामार्गामुळे येथे सातत्याने मोठी वाहनांची वर्दळ असते. शहरात दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असून विविध वित्तीय संस्थांच्या माध्यमातून वाहन खरेदीची मोठी उलाढाल होते. असे असतानाही प्रस्तावित संगमनेर-अकोले कार्यक्षेत्रातील एकूण वाहने २ लाख ५४ हजार ५९२ असल्याचे दाखवून शासनाच्या ५ लाख वाहनांच्या निकषाची पूर्तता होत नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# मंदिरात प्रवेश देवीचे दर्शन अन् दानपेट्यांवर डल्ला!

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

मंदिरात प्रवेश देवीचे दर्शन अन् त्यानंतर दानपेट्यांवर डल्ला! एकाच रात्री पारनेर तालुक्यातील राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान, ब वर्ग तीर्थक्षेत्र,श्रीक्षेत्र निघोज व वडगाव गुंड तसेच शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील मंदिरांना चोरट्यांनी लक्ष्य केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. निघोज येथील मळगंगा देवी मंदिरातील चोरीचा थरारक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, तब्बल पाच चोरटे या फुटेजमध्ये दिसत आहेत.

चोरीची सुरुवात रात्री सुमारे एक वाजता वडगाव गुंड येथील भैरवनाथ मंदिरापासून झाल्याचे समोर आले आहे. चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी फोडली. त्यानंतर शिरूर-पारनेर तालुक्याच्या सरहद्दीवरील टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिरातील दानपेटी फोडण्यात आली. ही दानपेटी अनेक दिवसांपासून उघडण्यात आली नसल्याने त्यामध्ये मोठी रक्कम जमा असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

यानंतर मध्यरात्री दोन ते तीनच्या दरम्यान चोरट्यांनी श्रीक्षेत्र निघोज कुंडमाऊली येथील मळगंगा देवी मंदिर गाठले. पाच चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून प्रथम गाभाऱ्याचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यात ते अपयशी ठरले.

'किल्ली कुठे आहे?'... उत्तर मिळताच धमकी!

गाभाऱ्याचा दरवाजा उघडता न आल्याने

**■ एकाच रात्री तीन मंदिरांत चोरी; सीसीटीव्हीत पाच चोरटे कैद**

**■ ब वर्ग तीर्थक्षेत्र निघोज-टाकळी हाजी परिसरात खळबळ**





चोरट्यांनी मंदिरात झोपलेल्या अतुल उद्धव कारकुड यांना उठवले आणि किल्ली मागितली. किल्ली नसल्याचे सांगताच चोरट्यांनी त्यांची झडती घेतली आणि गप्प झोप, नाहीतर मारून टाकू, अशी धमकी दिली. जीवाच्या भीतीने कारकुड पुन्हा झोपून राहिले.

त्यानंतर चोरट्यांनी गाभाऱ्याचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. मंदिरातील चार दानपेट्यांपैकी दोन दानपेट्या फोडण्यात त्यांना यश आले. विशेष म्हणजे चोरटे तब्बल एक तासापेक्षा अधिक काळ मंदिरात होते.

रोकड अन् चांदीचा ऐवज लंपास

निघोज मळगंगा देवी मंदिरातून अंदाजे ५० हजार रुपये रोख आणि चांदीचा ऐवज असा एकूण ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची फिर्याद मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांनी दिली आहे.

फॉरेन्सिक, ठसे तज्ज्ञ आणि श्वानपथकाकडून तपास

घटनेची माहिती मिळताच पारनेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष खेडेकर, सहायक पोलिस निरीक्षक दिवटे, पोलिस उपनिरीक्षक कोळपे यांच्यासह पोलिस अंमलदार प्रशांत दिनकर, अमोल धामणे, प्रकाश बोबडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. फॉरेन्सिक टीम, अंगुली मुद्रा तज्ज्ञ आणि श्वानपथकानेही घटनास्थळाची पाहणी केली.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू असून, लवकरच आरोपींपर्यंत पोहोचू, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

'दर्शन' की आधीच केलेली रेकी?

मळगंगा देवीचे दर्शन घेतल्यानंतर चोरटे चोरी करत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे चोरट्यांनी आधी मंदिरांची रेकी केली होती का? त्यांना दानपेट्यांची माहिती कोणी दिली? स्थानिक पातळीवर कोणाचे सहकार्य होते का? या सर्व शक्यता पोलिस तपासत आहेत.

चोरटे पारनेर, शिरूर किंवा जुन्नर तालुक्यातील असण्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

'चोर पकडा, अन्यथा आंदोलन' - ग्रामस्थांचा इशारा

निघोज येथील मळगंगा देवी मंदिरात वारंवार चोरी होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे. मंदिराच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी करण्यात आली आहे. चोरीचा तपास लवकर न लागल्यास आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

एक रात्र तीन मंदिरं पाच चोरटे आणि सीसीटीव्हीत कैद झालेला संपूर्ण 'क्राईम सीन'! आता पोलिसांच्या तपासात या मंदिरफोडीच्या टोळीचा पर्दाफाश कधी होतो, याकडे निघोजसह परिसराचे लक्ष लागले आहे.



# अहिल्यानगर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा ग्रामसभांवर बहिष्कार

## संघटनेचे जिल्हा प्रशासनाला निवेदन



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्राम सभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन.पाटील यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा अहिल्यानगर जिल्हा ग्राम पंचायत अधिकारी संघटनेने तीव्र निषेध नोंदविला आहे. ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आल्याने राज्य संघटनेने दि. १८ ऑगस्ट २०२६ पासून आयोजित होणाऱ्या ग्रामसभांवर अनिश्चित काळासाठी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर निर्णय हा शासनाच्या काम काजास अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशाने नसून ग्रामपंचायत अधिकारी यांच्या जीवाताची व सुरक्षिततेची हमी , कामाचा अनावश्यक वाढलेला ताण व ग्रामसभा बैठकी दरम्यान निर्माण होणाऱ्या अनुचित परिस्थितीपासून संवर्गाचे संरक्षण या अत्यंत गंभीर बाबींचा पार्श्वभूमीवर घेण्यात आलेला आहे.

या राज्यव्यापी निर्णयाची अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यातही करण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन जो पर्यंत शासनस्तरावरून ग्रामसभेबाबत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत नाहीत व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या सुरक्षितेबाबत स्पष्ट शासन निर्देश निर्गमित होत नाहीत तोपर्यंत जिल्ह्यात ज्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा आयोजित करण्यात आल्या आहेत तसेच यापुढील काळात होणाऱ्या ग्रामसभेत सचिव म्हणून ग्रामपंचायत अधिकारी कामकाज करणार नाही असा ठाम निर्णय संघटनेच्या वतीने घेण्यात आला.

ग्रामपंचायत अधिकारी हा गावपातळीवर शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतो. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, जन्म-मृत्यू नोंदणी, विविध दाखले व अभिलेख, जनगणना, निवडणूक प्रक्रिया, आपत्ती व्यवस्थापन, शासकीय अभियानांची अंमलबजावणी यासह अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर असतात.

अलीकडे ग्रामसभेत अनेक ठिकाणी वादविवाद, हुल्लडबाजी, शिवीगाळ, धमकी, धक्काबुक्की, मारहाणीसारखे प्रकार घडत आहेत, काही ठिकाणी गंभीर गुन्हे दाखल करण्याची वेळ येत आहे, गावातील असामाजिक तत्वाकडून ग्राम पंचायत अधिकारी, कर्मचारी, सरपंच , पदाधिकारी यांच्याविरुद्ध खोट्या, तथ्यहीन व मोघम स्वरूपाच्या तक्रारी करण्यात येत असुन, त्यांच्यावर अनावश्यक प्रशासकीय व सामाजिक दबाव निर्माण केला जात आहे, अनेक ठिकाणी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात काही युवक सोशल मिडिया मधून ग्रामपंचायती बाबत कुठलीही शहानिशा न करता चुकीचे व्हिडिओ समाजामध्ये प्रसारित करत असतात, त्यामुळे ग्रामपंचायती सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेची प्रतिमा मलिन होत आहे. ग्रामसभेत गावाच्या विकासाबाबत चर्चा न होता व लोकसहभागाचे व्यासपीठ न राहाता वैयक्तिक वाद, स्थानिक राजकीय संघर्ष आरोप - प्रत्यारोप, वैमनस्य, एकमेकांची ऊनेदुनी काढणे याचे केंद्र बनले आहे.

अशा परिस्थितीत गावपातळीवर जनतेशी थेट संपर्कात राहून काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित, निर्भय आणि तणावमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र, शिवरे दिगर येथील दुर्दैवी घटना ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष युवराज पाटील यांनी सांगितले की, शिवरे दिगर येथे घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी आहे. हा केवळ एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याचा मृत्यू नसून संपूर्ण ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी संवर्गाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. लोकशाही प्रक्रियेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जर सुरक्षितता मिळणार नसेल, तर त्याबाबत शासन व प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## गटेवाडी-राळेगणसिद्धी रस्त्याच्या प्रश्नावर उपोषणाला यश;

### ३१ ऑगस्टला सर्वेक्षण करून रस्ता अतिक्रमणमुक्त होणार

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

गटेवाडी ते राळेगणसिद्धी रस्त्याच्या हक्कासाठी शेतकरी इंद्रभान दगडू सकट यांनी पारनेर तहसील कार्यालयासमोर सुरू केलेल्या आमरण उपोषणाला अखेर यश आले.



प्रशासनाने ३१ ऑगस्ट रोजी संपूर्ण रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण करून रस्त्याची हद्द निश्चित करण्यासह अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्याची कार्यवाही करण्याचे मान्य केल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

गटेवाडी गावठाणाजवळील गटेवाडी-राळेगणसिद्धी रस्ता अतिक्रमणामुळे गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला होता. रस्ता बंद असल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना शेतात ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्ता खुला करण्यासाठी वारंवार निवेदने देऊनही ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर सकट यांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले.

या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते रवी रासकर, मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पवार, शेतकरी शिवपानंद चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्यासह अनेक शेतकरी, ग्रामस्थ व समर्थकांनी ठाम पाठिंबा दिला. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला व्यापक पाठबळ मिळाले.

प्रशासनाने ३१ ऑगस्ट रोजी सर्वेक्षण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण स्थगित केले. त्यामुळे आता प्रशासन प्रत्यक्ष सर्वेक्षण करून रस्त्याची हद्द निश्चित करून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही कधी आणि कशी करते, याकडे शेतकरी व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## राहुरीच्या अनुजाने गाठले यशाचे शिखर- Mpsc परीक्षेतून राज्य कर निरीक्षक STI पदी निवड !

**राहुरी (समर्थ गांवकरी)**



मेहनतीला मिळाले यशाचे गोड फळ मिळते. राहुरीत तालुक्यातील पिंपरी अवघड येथील राहुरीच्या अनुजाने गाठले यशाचे शिखर- Mpsc परीक्षेतून राज्य कर निरीक्षक STI पदी निवड झाली असून अनुजा पवार यांच्या निवडीने कुटुंबीयांसह परिसरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे .

जिद्द, चिकाटी, सातत्य आणि अथक मेहनतीच्या जोरावर कु.अनुजा ज्ञानदेव पवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या MPSC परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत 'राज्य कर निरीक्षक (STI)' या पदाला गवसणी घातली आहे.

अनेक अडचणी आणि आव्हानांवर मात करत अनुजा पवार यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले. अभ्यासातील सातत्य, नियोजनबद्ध तयारी, कठोर परिश्रम आणि स्वतःवर असलेला विश्वास या बळावर त्यांनी हे यश संपादन केले.

या यशात अनुजाच्या आईचा आणि बहिणीचा सिंहाचा वाटा आहे त्यांची बहीण, दाजी आणि छोटा भाऊ हेही IT क्षेत्रात नोकरी करतात. आई वडील दोघांनीही कष्ट करून तिन्ही अपत्यांना उच्च शिक्षण दिले त्यांच्यावर सुसंस्कार केले म्हणूनच आज दोन्ही मुली आणि मुलगा चांगल्या पदावर नोकरीला लागले.

## एक धागा राष्ट्रसेवेसाठी; सीमेवरील सैनिकांना ३ हजार राख्या व संदेश



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयातील कर्मवीर भाऊराव पाटील स्काऊट पथक व लक्ष्मीबाई पाटील रेंजर पथकाच्या संयुक्त विद्यमाने 'एक धागा राष्ट्रसेवेसाठी' हा भावपूर्ण उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. विद्यालयातील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगाल तसेच विविध सीमावर्ती भागात कार्यरत असलेल्या सैनिकांसाठी राख्या व प्रेमळ संदेश पाठविले. विद्यार्थी व शिक्षकांच्या वतीने सुमारे ३ हजार राख्या सैनिकांना पाठविण्यात आल्या.

विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सुनीता काकडे तसेच सर्व महिला शिक्षिकांनीही या उपक्रमात सहभागी होत आपल्या सैनिक भावांसाठी राख्या व संदेश पाठवून देशसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## अकोले बाजार समितीत भाजीपाल्याला मिळाले असे दर

**(समर्थ गांवकरी)**

दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला बाजारात एकूण ५८४ डागांची आवक झाली. विविध भाजीपाल्याला मिळालेले प्रतिकिलो दर पुढीलप्रमाणे आहेत:

बाजार समितीचे सभापती भानुदास पाटील तिकांडे, उपसभापती रोहिदास पाटील भोर, सर्व संचालक व प्रभारी सचिव राजेंद्र जगताप यांनी शेतकरी बांधवांनी शेतमालाची योग्य निवड व प्रतवारी करून अकोले मुख्य बाजार आवारात विक्रीस आणावा, असे आवाहन केले आहे. शेतमालाला योग्य दर व वजन मिळण्यासोबतच विक्री झालेल्या मालाची रक्कम ४८ तासांत मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रक्कम वेळेत न मिळाल्यास बाजार समितीतील संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ कळवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**भाजीपाला दर (रु./किलो)**

| | |
|---|---|
| घेवडा | ३५ ते ४० |
| फरशी बी | ५० ते ६० |
| चवळी | ५० ते ५५ |
| वालवड | ५० ते ६१ |
| भेंडी | २० ते २५ |
| मिरची | ३० ते ४० |
| सीताफळ | २० ते २५ |
| कोबी | १० ते १५ |
| टोमॅटो | १० ते १३ |
| काकडी | १३ ते २१ |
| दुधी | १० ते १४ |
| फ्लॉवर | १५ ते २३ |
| बीट | २० ते २६ |
| घोसाळे | २० ते २५ |
| दोंडका | ३० ते ३५ |
| कारले | ४० ते ४५ |

## 'राळेगण सिद्धी मध्ये दहा कोटी नशामुक्त महाअभियान'

### डी बी एम स्कूलमध्ये व्यसनमुक्तीवर प्रभावी मार्गदर्शन

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार; नशेला दूर ठेवा, उज्ज्वल भविष्य घडवा, या प्रभावी संदेशातून 'दहा कोटी नशामुक्त महाअभियाना'अंतर्गत डी बी एम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, राळेगण सिद्धी येथे व्यसनमुक्तीविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते बारावीतील सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या कार्यक्रमास प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, पारनेर सेंटरच्या संचालिका साधना दीदी, संगीता दीदी, स्नेहालय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम आणि त्यापासून दूर राहण्याचे महत्त्व समजावून सांगितले. नशा सोडा, जीवन जोडा; व्यसन टाळा, भविष्य घडवा, या संदेशातून त्यांनी व्यसनामुळे शरीर, मन, कुटुंब आणि समाजावर होणाऱ्या विपरीत परिणामांची माहिती दिली. केवळ अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहणे पुरेसे नसून सकारात्मक विचार,



चांगली जीवनशैली आणि आत्मसंयमही आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जी. डी. मापारी (सर) यांनी व्यसनाधीनतेच्या बदलत्या स्वरूपावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना डिजिटल डिटॉक्सचा संदेश दिला. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा अतिरेक हा देखील तरुण पिढीसाठी व्यसनाचे स्वरूप घेऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. स्क्रीन कमी, स्वप्न मोठे; मोबाईलवर नियंत्रण, भविष्याचे संवर्धन, असा संदेश देत तंत्रज्ञानाचा विवेकी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करून त्यांना आरोग्यदायी, सकारात्मक व संस्कारक्षम जीवनाकडे प्रेरित करणारा हा उपक्रम ठरला.

## समर्थ महाविद्यालया बेल्हे येथे हार्डवेअर अँड नेटवर्किंग कार्य शाळा संपन्न

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्स, समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'हार्डवेअर अँड नेटवर्किंग' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.या कार्य शाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यां ना संगणक हार्डवेअर आणि नेटवर्किंगची माहिती देण्या सोबतच त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणे हा होता.

कार्यशाळेत संगणकातील विविध हार्डवेअर घटक,त्यांची ओळख,कार्यपद्धती,संगणकाची रचना तसेच हार्डवेअरशी संबंधित सामान्य तांत्रिक अडचणी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच नेटवर्किंग म्हणजे काय, नेटवर्कचे विविध प्रकार, नेटवर्कमध्ये वापरली जाणारी उपकरणे,संगणकांना नेटवर्क शी जोडण्याची पद्धत आणि नेटवर्किंगमधील प्राथमिक बाबी यांची माहिती विद्यार्थ्यां ना देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विषय समजावून सांगण्यात आल्याने त्यांना शिकलेल्या बाबी अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता आल्या.

कार्यशाळेदरम्यान प्रा.मृणाल डहाळे, प्रथमेश धोत्रे सतीश पवार आणि सिद्धेश अहिरेयांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिकांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या शंकांचे निरसन करून हार्डवेअर व नेटवर्किंगशी संबंधित आवश्यक माहिती सोप्या पद्धतीने देण्यात आली.आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संगणक आणि नेटवर्किंगचे ज्ञान विद्यार्थ्यां साठी अत्यंत उपयुक्त आहे. अभ्यासक्रमातील विषयां सोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तांत्रिक ज्ञान मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यातील नोकरी व उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्याल याचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर,व्यवस्थापन संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.स्नेहा शेगर, जनसंपर्क अधिकारी डॉ.शरद पारखे,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपक्रमाचा लाभ घेतला.



विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे उपयुक्त आणि ज्ञानवर्धक उपक्रम नियमितपणे आयोजित केल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्यांच्या विकासासही मदत होत असल्याचे यावेळी संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके सर म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

## सिंहासनाच्या जीर्णोद्धारात सापडली प्राचीन मूर्ती; वडगाव दर्यात उलगडले हजारो वर्षांचे गूढ!

**पारनेर (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील श्रीक्षेत्र वडगाव दर्या येथे श्री दर्याबाई देवीच्या सिंहासनाच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असताना जमिनीखाली काळ्या पाषाणातील प्राचीन दगडी मूर्ती आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सिंहासनाच्या कामादरम्यान देवीचा सध्याचा तांदळा हलल्यानंतर ग्रामस्थांनी काळजीपूर्वक पाहणी केली असता ही मूर्ती आढळून आली.

मूर्तीवरील लाल चुना आणि शेंदूराचा थर काढल्यानंतर पद्मासनातील मूर्तीचे स्वरूप स्पष्ट झाले. मस्तकावरील रचना, चेहरा, डोळे, नाक, कान तसेच हातातील बांगड्यांची रचना दिसून येत असल्याचे पुजाऱ्यांनी सांगितले. मूर्तीच्या शेजारी बालरूपातील परशुरामाची आकृती असल्याचा अंदाजही व्यक्त केला जात आहे. मात्र, मूर्ती काही प्रमाणात भग्न अवस्थेत असून तिचे नेमके वय, कालखंड आणि ऐतिहासिक महत्त्व तज्ज्ञांच्या अभ्यासानंतरच स्पष्ट होणार आहे.

मूर्ती सापडल्याची माहिती परिसरात पसरताच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली असून वडगाव दर्या परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थ आणि भाविकांच्या वतीने तीन दिवसीय नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्राचीन मूर्ती कायमस्वरूपी जतन करायची की तिच्यासारखी नवीन मूर्ती तयार करायची, याबाबत ग्रामस्थ व भाविकांच्या मताने निर्णय घेण्यात येणार आहे. या प्राचीन मूर्तीच्या शोधामुळे वडगाव दर्याच्या धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरेवर नव्याने प्रकाश पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## माळशेज परिसरात फ्लेमिंगो चे सालाबादप्रमाणे आगमन (विविध पक्ष्यांची मांदियाळी: पक्षीनिरीक्षक,पर्यटकांसाठी नव्याने पर्वणी)

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील माळशेज घाट,पिंपळगाव-जोगा धरण,हरीचंद्रगडाच्या पायथ्याशी असणंरे पुष्पावती नदीचे उगम स्थान व नगर- कल्याण या राष्ट्रीय महामार्ग सुविधा यामुळे हा परिसर वर्षभर पर्यटकांनी गजबजले ला असतो.मात्र सध्या धरणा च्या बॅकवॉटर परिसरातील खिरेश्वर,सांगणोरे, गवारवाडी, कोल्हेवाडी, खुबी-करांजळे, तसेच माळशेज घाटमाथ्या वरील एमटीडीसीच्या मागील तलावावर रोहित (अग्निपंख) तथा फ्लेमिंगो पक्ष्यांसह

विविध प्रकारच्या पक्ष्यांचे आगमन झाले आहे.त्यामुळे पक्षीनिरीक्षक व पर्यटकांसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे.

याविषयी अधिक माहिती देताना ओतूर वनविभागाचे वनक्षेत्रपाल म्हणाले शासकीय नोंदीनुसार सन १९८० पासून सालाबाद प्रमाणे पावसाळ्यात फ्लेमिंगो या परिसरात येतात,दरवर्षी

जून किंवा जुलै महिन्यात या पक्ष्यांचे आगमन होत असते. यावर्षी ११ऑगस्ट रोजी त्यांचे आगमन झाले आहे आणि साधारणतः ऑक्टोबर पर्यंत त्यांचा येथे मुक्काम राहू शकतो शिवाय हे पक्षी आफ्रिका,न्यूझीलंड,या परदेशातून तसेच आपल्या कडील ठाणे,उज्ञैन, वसई

खाडी,अभयारण्यातूनही येतात.माळशेज परिसरातील मुसळधार पावसामुळे येथील पाणथळ व दलदलीची जागा, शिवाय धरणात साठलेले पाणी यामुळे या पक्ष्यांचे आवडते खाद्य जसे मासे, खेकडे,शेवाळ व अन्य खाद्यान्न मुबलक प्रमाणात उपलब्ध होते.

शेवाळ खाल्लयाने फ्लेमिंगोचे पंख गुलाबीरंगाचे बनतात असे म्हणतात. या पक्ष्यांची सामाजिकता खूप घट्ट असल्याने ते छोट्या मोठ्या समुहाने रहातात.सध्या या परिसरात पाचशे ते हजार

पक्षी समुहाने उतरले आहेत अजून आगमन सुरू असून त्यांची संख्या वाढून पन्नास हजाराच्या घरात पोहचू शकते असे पक्षीनिरीक्षकांना आशा आहे.या परदेशी पाहुण्यांसह स्थलांतरित हळदी-कुंकू बदक चित्रबलाक,छोटा बगळापांढरा शराटी,राखाडी बगळाकाळा शराटी,लाजाळू पाणकोंबडी, चमचा पक्षी,काळसर पाणकोंबडी,शेकट्या,पाणकावळा, करकोचा, नील,खंड्या,पारवे,कबुतरे,साळुंखी,रानकावळे,यासारख्या विविध प्रकारच्या व रंगीबेरंगी पक्ष्यांची या परिसरातील जंगलात रेलचेल वाढली असून हे पक्षीप्रेमी पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

हे पक्षी एकटे येत नाहीत समुहाने साधारणतः४००- ५००पक्षी एका समुहात असू शकतात.त्यांची हालचाल अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने असते.त्यांचा लाजाळू स्वभाव त्यांना अधिक सुंदरता प्रदान करतो मात्र या स्वभावामुळे या पक्षांचे छायाचित्र मिळविणे हे एक दिव्य असते त्यामुळे फोटो फारसे उपलब्ध होत

नाही.त्यांच्या रंगामुळेआकाशा तील झेपावणे अतिशय विलोभनीय दिसते.या विभागात फ्लेमिंगो आले,हे समजल्यानंतर ओतूर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी



चैतन्य कांबळे यांनी पक्ष्यांना कोणीही त्रास देऊ नये यासाठी पर्यटकांना आवाहन केले आहे. त्याच बरोबर खास वनरक्षकांची व वनकर्मचारी यांची नेमुणूक केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अगस्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी!

अकोले (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य आणि सभासदांच्या सहभागातून स्थापन झालेल्या अगस्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोल्हार–घोटी रोडवरील महाराजा लॉन्स येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अशोकराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे ज्येष्ठ संचालक मारुती भिंगारे यांनी दिली.

अहवाल वर्षात संस्थेने अनाठायी खर्चाला फाटा देत कर्ज वितरणावर भर दिला असून, सभासद आणि सर्वसामान्य ठेवीदारांचा विश्वास संपादन केला आहे. अहवाल वर्षात संस्थेचे दिवंगत सभासद व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार, माजी अध्यक्ष रमेश धुमाळ तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार विधिज्ञ स्व. देविदास देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थेची सभासद संख्या ९ हजार ९५८ असून, भागभांडवल १ कोटी ४१ लाख ५१ हजार ३३५ रुपये, राखीव निधी १ कोटी ५७ लाख २५ हजार ८१६ रुपये, इतर निधी १४ कोटी १६ लाख ४७ हजार ३०९ रुपये, स्वनिधी ४ कोटी ३८ लाख २५ हजार ३२८ रुपये, ठेवी १४६ कोटी ६३ लाख ३५ हजार २५९ रुपये, कर्ज वितरण १०० कोटी ७ लाख ३६ हजार ८०३ रुपये, गुंतवणूक ३१ कोटी ५८ लाख ५० हजार ४६७ रुपये, तर खेळते भागभांडवल १७७ कोटी ७८ लाख २९ हजार ६५७ रुपये आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल १७९० कोटी ७१ लाख ९३ हजार १८१ रुपये असून, थकबाकी १८ कोटी ३४ लाख ३५ हजार ५६ रुपये आहे. संस्थेचा सीडी गुणोत्तर ६६.४४ टक्के असून, संस्थेला 'ब' लेखापरीक्षण वर्ग प्राप्त झाला आहे. संस्थेचा एकूण नफा २८ लाख १४ हजार ६२१ रुपये ६८ पैसे झाला आहे.

संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात असून, मुख्य कार्यालयासह शहर शाखा तसेच ब्राम्हणवाडा, राजूर, कोतूळ, कळस बुद्रुक, शिवाजीनगर, रुंभोडी आणि शमशेरपूर येथे शाखा कार्यरत आहेत. संस्थेने अहवाल वर्षात एकूण १२ सभा घेतल्या आहेत. माजी खासदार सदाशिव लोखंडे, आमदार डॉ. किरण लहामटे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे आणि सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी संस्थेला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली आहे. संस्थेच्या माध्यमातून सभासद व ठेवीदारांना व्यवहाराची माहिती भ्रमणध्वनी संदेशाद्वारे देण्यात येते. तसेच वीजबिल भरणा, आरटीजीएस सेवा आणि







मागणीनुसार कर्ज वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२५–२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण एस. झेड. देशमुख अँड कंपनी यांनी केले आहे. स्पर्धेच्या युगात अनावश्यक खर्चाला आळा घालून उत्तम सुविधा, तत्पर सेवा आणि विनम्र सेवा देण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे भिंगारे यांनी सांगितले. सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष गणेश पापळ ज्येष्ठ संचालक मारुती भिंगारे, गणेश पापळ, सहकारमहर्षी सीताराम पाटील गायकर, शिवराम भोर, अक्षय पोखरकर, प्रमोद मंडलीक, शिवाजी गोंदके, रावसाहेब भोर, गुलाब आरोटे, पद्मा गायकवाड, माजी अध्यक्ष तथा विद्यमान तज्ज्ञ संचालक बाळासाहेब भोर, सुरेश देशमुख, अनिल कोळपकर, अक्षय आभाळे, कार्यकारी संचालक दिलीपराव उदमले, कर्ज विभाग प्रमुख पांडुरंग जाधव यांच्यासह संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाने केले आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### बहिण -भावाच्या बंधनाला महागाईची झळ

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्रावण महिना लागताच सणांची रेलचेल सुरू होते बहिण भावाच्या प्रेमळ नात्याच श्रणानुबंध जपणारा सन म्हणजे रक्षाबंधन मात्र यंदा भावा बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असणारी राखी यंदा २० ते २५ टक्क्यांनी महागली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले रक्षाबंधनानिमित्त शहरात तीन बाजारपेठ गर्दीने फुलून गेली आहे.

भाऊरायाच्या पसंतीस उतरेल अशी राखी घेण्यासाठी महिलांनी बाजारात गर्दी केली होती तर दुसरीकडे आपल्या बहिणीसाठी भेटवस्तू खरेदी करताना युवा वर्ग दिसत आहे.

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त विविध बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्री दाखल झाले आहेत महिलांना या राख्या भरत आहे बहीण भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला सण रक्षाबंधन २८ ऑगस्टला साजरा होणार आहे मात्र यंदा महागाईमुळे दरांमध्ये काही काही प्रमाणात वाढ झाल्याने राख्या विक्रेत्यांकडून सांगण्यात आले कमीत कमी दहा रुपयापासून ५५० ते ६०० रुपये किमतीच्या विविध प्रकारच्या राख्या रक्षाबंधन निमित्त बाजारपेठेत उपलब्ध आहेत.

### कर्जमाफीसाठी ४ हजार कोटी; दुसर्या टप्प्यात लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दुसर्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकर्यांना २ लाखांपर्यंत पीककर्ज माफी दिली जात असून, आतापर्यंत ४३ हजारांहून अधिक शेतकरी कर्जमुक्त झाले असून त्यांच्या खात्यात ३७४ कोटींहून अधिक रक्कम जमा झाली आहे.




सन २९२६–२७ या आर्थिक वर्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी. २०,५५२ कोटी रूपये इतका निधी मंजूर असून सद्यस्थितीत. १३,५५१ कोटी रूपये निधी शिल्लक आहे. या निधीपैकी चार हजार कोटी रूपयांचा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. ही रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होणार आहे. यासंदर्भात परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

### श्रीगोंदा बसस्थानकाच्या विकासात आणखी एक मानाचा टप्पा; पाच नव्या बस दाखल



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा बसस्थानकाच्या विकासात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघातील प्रवाशांच्या सुविधेत भर पडली आहे. लोकनेते तथा माजी मंत्री बबनरावजी पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार विक्रमदादा बबनराव पाचपुते यांच्या विशेष प्रयत्नातून श्रीगोंदा बसस्थानकात नव्याने पाच बस दाखल झाल्या.

या नव्या बसची विधिवत पूजा डॉ. सौ. प्रतिभाताई बबनराव पाचपुते (अक्का) यांच्या शुभहस्ते करण्यात आली. नव्या बसमुळे श्रीगोंदा शहरासह तालुक्यातील प्रवाशांना अधिक चांगली आणि सुलभ बससेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

यावेळी शहरातील नगरसेवक, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या बसच्या आगमनामुळे प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, बससेवा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

श्रीगोंदा शहर व तालुक्याच्या विकासाबरोबरच नागरिकांना दर्जेदार प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी उपस्थितांकडून सांगण्यात आले.

### विद्यार्थिनींकडून सीमेवरील सैनिकांना राख्या; मढेवडगावच्या माजी सैनिक संघटनेचा उपक्रम



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

मढेवडगाव येथील माजी सैनिक संघटना आणि न्यू इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधनानिमित्त देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या सैनिक बांधवांसाठी विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या पाठविण्यात आल्या. गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात असून, यंदाही विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देत मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या सैनिकांप्रती आदर, कृतज्ञता आणि आपुलकी व्यक्त करण्याच्या उद्देशाने माजी सैनिक संघटनेने हा उपक्रम सुरू केला आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थिनींनी आकर्षक व सुंदर राख्या तयार करून त्या सीमेवरील सैनिक बांधवांना पाठविल्या.

# उद्योजक विश्वास गुंजाळ यांची खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची अनोखी थाप

## अवधूत ऑटो कंपोनंटकडून खेळाडूंना ५० स्पोर्ट्स टी–शर्टची भेट

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



देवदैठणच्या सरपंच जयश्रीताई गुंजाळ आणि उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांच्या पुढाकारातून चिखली येथील अवधूत ऑटो कंपोनंटच्या वतीने श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ५० स्पोर्ट्स टी–शर्ट भेट देण्यात आले. सुमारे २० हजार रुपये किमतीच्या या साहित्यामुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडू दरवर्षी जिल्हा, विभाग तसेच राज्यस्तरावरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, त्यांच्या पाठीवर प्रोत्साहनाची थाप देण्यासाठी गुंजाळ परिवाराच्या वतीने सातत्याने क्रीडा साहित्याची मदत केली जात आहे.

यावेळी श्रीगोंदा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे, सरपंच जयश्रीताई गुंजाळ, उपसरपंच रेश्मा कौठाळे, लक्ष्मीकांत दंडवते, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, सुवर्णा ढवळे, सतीश वाघमारे, रामचंद्र वाघमारे, सर्जेराव कौठाळे, जयसिंग कौठाळे, नानाभाऊ वाघमारे आदी उपस्थित होते.

खेळाडूंना केलेल्या मदतीबद्दल प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ आणि क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी सरपंच जयश्रीताई गुंजाळ व उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांचे आभार मानले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगावचे उल्लेखनीय यश



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव विद्यालयातील विद्यार्थिनी श्रद्धा प्रमोद शिंदे हिने उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राहिली असून, विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सातत्यपूर्ण नियोजन, कठोर सराव आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाच्या जोरावर श्रद्धाने हे यश मिळविले. शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी विभागप्रमुख मनीषा व्यवहारे (इंग्रजी), रामदास पवार (मराठी), वैभव काळुखे व प्रणव नलगे (गणित), शंकर यदलोड (इंग्रजी), महादेवी माने व विकास चव्हाण (बुद्धिमत्ता) यांनी विशेष मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक हौसराव दांगडे व पर्यवेक्षक विलास सुलाखे यांचीही तिला प्रेरणा लाभली.

# संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेतील स्कॉलरशिप विजेत्या ४ विद्यार्थ्यांना कृष्णा बागडे यांच्याकडून सायकल भेट

## अभ्यास करून आई–वडील व शाळेचे नाव उज्ज्वल करा : कृष्णा बागडे



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या ४ विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे माजी खजिनदार कृष्णा बागडे यांच्या हस्ते शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या चार विद्यार्थ्यांना सायकली भेट देण्यात आल्या.विजेत्या विद्यार्थ्यांची नावे मुलिका गवळी, वैष्णवी कवडे,पल्लवी चाबुकस्वार, चिन्मय गवते आहे.

विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उज्ज्वल करावे

यावेळी मार्गदर्शन करताना कृष्णा बागडे म्हणाले, संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आई–वडील व शाळेचे नाव उज्ज्वल करावे.

मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी शालेय शिक्षण समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे, व्हाईस चेअरमन सौ.मृणालताई कनोरे, संस्थेचे खजिनदार गजेंद्र सोनवणे, शिक्षण समितीचे सचिव संजय सागांवकर, स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक,सचिन मडके,चंद्रकांत मानकर, किरण डफळ,प्रसाद कांबळे,योगेश पांढरपोटे, राकेश गवते,निलेश मिसाळ,नीरज चांगटे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे, बबनभाई शेख, राजेंद्र गर्जे, सुशीलकुमार आंधळे, चंदा कार्ले, वैशाली केदारे, सुरेखा कर्डिले, राणी पवार, अनिता जपकर, विद्या नरसाळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदा कार्ले यांनी केले तर आभार राजेंद्र गर्जे यांनी मानले.

# श्रावणमास पर्वकाळात चरण पादुका पूजन व सामुदायिक शिव उपासना

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्रावणमास पर्वकाळानिमित्त परांबिका उपासक प. पू. राजाधिराज योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या पवित्र चरण पादुकांचे पूजन तसेच सामुदायिक शिव उपासना व लिंगार्चन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडीतील शुभमंगल कार्यालय, पालखी शिशुविहार, भिडे हॉस्पिटल चौकात दि. २० ते २२ ऑगस्ट २०२६ दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने संपन्न होणार आहेत.

प. पू. सद्गुरूच्या मार्गदर्शनाखाली श्रीहरिहर सद्गुरू शक्तिपीठ, छत्रपती संभाजीनगर येथून प. पू. अंबरीश महाराज तथा प. पू. अनिरुद्ध महाराज यांच्या गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी प. पू. स्वामींच्या पादुकांसह अहिल्यानगर शहरात आगमन होणार आहे. त्यानंतर दि. २० ते २२ ऑगस्टदरम्यान इच्छुक भाविकांच्या घरी प. पू. स्वामींच्या चरण पादुकांचे पूजन संपन्न होणार आहे.



या पवित्र चरण पादुका पूजन सोहळ्यासोबतच शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सामुदायिक शिव उपासना लिंगार्चन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत लिंगार्चन पूजनाचा कार्यक्रम होणार असून, त्यानंतर रात्री ७ ते ८ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सद्गुरु च्या मार्गदर्शनाखाली १०८ मृत्तिकेची (मातीची) लिंगे तयार करून त्यांचे रुद्रस्वरूपी लिंगाचे षोडशोपचार पूजन, नैवेद्य व आरती करण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्यात प. पू. अंबरीश महाराज तसेच प. पू. अनिरुद्ध महाराज यांची उपस्थिती लाभणार आहे.

श्रावणमास हा भगवान शिवाच्या आराधनेसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो.

या पवित्र पर्वकाळात सद्गुरूंच्या चरण पादुकांचे पूजन तसेच सामुदायिक शिव उपासनेत सहभागी होण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

इच्छुक भाविकांनी चरण पादुका पूजन तसेच लिंगार्चन सोहळ्यासाठी नावनोंदणी करावी आणि मोठ्या संख्येने सहभागी होऊन पूजन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नावनोंदणीसाठी संपर्क :

श्री. संदीप जोशी – ९९२३० ८२५७७
श्री. कृष्णा गोसावी – ९७६७६ ५३५४८८
श्री. मनीष गुप्तेकर – ९८८१९ ६०९६२
श्री. अमित भालेराव – ९०२८२ ६६०७८
श्री. अनिकेत घोटणकर – ८८३०७ ३४६६३
श्री. सुहास नवगिरे – ९९२२५ १२४२४

# श्री व्यंकटेश्वर कल्याणम सोहळयातर्गत उत्सव मूर्तीची मिरवणुक

## श्रमिक बालाजी मंदिराच्या ३३ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त श्री निवासा गोविंदा... श्री व्यंकटेशा रमणा गोविंदा... श्रमिक निवासा गोविंदाच्या जय घोषात

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३३ व्या वार्षिक महोत्सव (ब्रम्होत्सव) निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दुपारी गांधी मैदान येथून बालाजी उत्सव मुतीच्या कोतवाली पोलीस स्टेशनचे निरीक्षक नितीन देशमुख यांच्या हस्ते आरतीने या मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी चंद्रकांत गुंड , विनायक गुडेवार , मुकुंद लखापती, संतोष बीज्ञा, नागेश तुम्मनपेल्ली,रवि दंडी, श्रीराम सेवा भक्त मंडळ सर्व सदस्य,सर्व बालाजी भक्त

संस्थेचे अध्यक्ष विनोद म्याना, उपाध्यक्ष अशोक इप्पलपेल्ली आदी उपस्थित होते.मूर्तीची मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात शहरासह सावेडी उपनगरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली. ठिकठिकाणी मिरवणुकीचे स्वागत केले.

मिरवणुकीत भक्त वत्सला गोविंदा व्यकंटरमणा गोविंदाच्या जय घोषात टाळ घेऊन श्री श्रमिक बालाजी महिलांचे भजनी मंडळ सहभागी झाले होते. सजवलेल्या रथावर स्वार श्री बालाजी ची उत्सव मुर्ती मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरत होती. आम्ही नगरकर ढोल पथकावर युवकांनी ठेका धरला होता.तसेच श्री स्वामी समर्थ बॅंड पथक ही सामील झाले होते.

गांधी मैदान येथून उत्सव मूर्तीची सुरू झालेली मिरवणुक श्रीराम मंदिनवीपेठ,कापड बाजार, तेली खुंट, चितळे रोड येथून मार्गक्रमण करत दिल्ली गेट येथे आली व सावेडी उपनगरात प्रोफेसर कॉलनी चौक पासून कुष्ठधाम रोडने मार्गक्रमण करत श्रमिक नगर येथील बालाजी मंदिर येथे मिरवणुकीचा समारोप झाला. २२ ऑगस्टला सव्वा रूपयात सामुदायिक विवाह सोहळा हा सामाजिक उपक्रम होणार आहे मिरवणुकीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. श्रमिक बालाजी मंदिराच्या वार्षिक महोत्सवासाठी इतर जिल्ह्याबरोबर राज्याबाहेरुनही भाविक दाखल झाले आहेत.

मंदिरावर महोत्सवा निमित्त करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई व



सजावटीने मंदिराकडे भाविकांचे मन वेधले जात आहे. आज रोजी दिप आराधना, ध्वजा रोहण, कलश स्थापनेचा कार्यक्रम झाला. मिरवणुकी नंतर रात्री करण्यात आलेल्या फटाक्यांच्या अतिषबाजीने भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. रात्री आरती नंतर कार्यक्रमाची समाप्ती झाली.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेचे सर्व विश्वस्त परिश्रम घेत आहे.